| लातूर | वर्ष ३५ वे | अंक १०२ वा | शुक्रवार, दिनांक १० जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)


प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## पेट्रोलच्या तुलनेत इथेनॉलचे कॅलरीफिक मूल्य कमी असले तरी प्रमाण वाढल्यास सरासरी मायलेजमध्ये किंचित घट होऊ शकते. मात्र,वाहनांवर परिणाम नगण्य- नितीन गडकरी






**नवी दिल्ली/वृत्तसेवा:** केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी पेट्रोलमधील वाढत्या इथेनॉल मिश्रणामुळे गाड्यांचे इंजिन खराब होत असल्याच्या आणि मायलेज कमी होत असल्याच्या दाव्यांना पूर्णपणे फेटाळले आहे. सोशल मीडियावर जे काही फिरत आहे, तो एका सुनियोजित खोट्या नरेटिव्हचा भाग आहे. मला अशी एक तरी कार दाखवा जिचे ई२० इंधनामुळे नुकसान झाले आहे, असे थेट आव्हान गडकरींनी दिले आहे. याचबरोबर नितीन गडकरी यांनी मान्य केले की पेट्रोलच्या तुलनेत इथेनॉलचे कॅलरीफिक मूल्य कमी असते, ज्यामुळे इथेनॉलचे प्रमाण वाढल्यास सरासरी मायलेजमध्ये किंचित घट होऊ शकते. मात्र, बहुतांश वाहनांवर याचा परिणाम नगण्य असेल.

ते पुढे म्हणाले, मायलेज केवळ इंधनावर नाही, तर ड्रायव्हिंगच्या परिस्थितीवरही अवलंबून असते. दिल्ली किंवा मुंबईसारख्या शहरांमधील ट्रॅफिकमध्ये गाड्या सतत खालच्या गियरमध्ये चालवाव्या लागतात. दिल्ली ते गुरुग्राम दरम्यानच्या ट्रॅफिकमध्ये तुम्हाला सतत ब्रेक दाबावे लागतात आणि वेग ४०-५० किमी प्रतितासच्या वर जात नाही. अशा 'स्टॉप-अँड-गो' ट्रॅफिकपेक्षा जेव्हा तुम्ही महामार्गावर १०० किमी प्रतितासच्या स्थिर वेगाने गाडी चालवाल, तेव्हाच तुम्हाला मायलेजमध्ये फरक जाणवू शकतो. 'एआरएआय'च्या अहवालानुसार, फ्लेक्स-इंधन इंजिनसाठी तयार केलेल्या वाहनांमध्ये मायलेजची कोणतीही समस्या नाही. 'द इंडियन एक्सप्रेस'ला दिलेल्या विशेष मुलाखतीत त्यांनी यावर सविस्तर भाष्य केले.

**इंजिन खराब होण्याचे कारण इथेनॉल नाही तर 'भेसळ'**

सोशल मीडियावरील इंजिन खराब झाल्याच्या दाव्यांवर गडकरी म्हणाले की, त्यांनी वाहन कंपन्यांना अशा काही प्रकरणांची चौकशी करण्यास सांगितले होते. या तपासात इंजिन खराब होण्यास इथेनॉल नाही, तर 'भेसळयुक्त इंधन' जबाबदार असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**इथेनॉल आणि मिथेनॉलमुळे इंधनाचा स्वस्त पर्याय**

नितीन गडकरी यांनी सांगितले की, सध्या इथेनॉलची किंमत सुमारे ७५ रुपये प्रतिलीटर आहे. सरकारचा उद्देश जनतेला वेगवेगळ्या किमतीत इंधनाचे अनेक पर्याय देण्याचा आहे. ब्राझील १९७० पासून २७% इथेनॉल मिश्रित पेट्रोल वापरत आहे आणि तिथे होंडा, ह्युंदाई सारख्या कंपन्यांच्या गाड्या कोणत्याही समस्येशिवाय चालत आहेत. भारतात टाटा मोटर्स, महिंद्रा, ह्युंडाई, टोयोटा आणि मारुती सुझुकी यांसारख्या जवळपास डझनभर कंपन्या फ्लेक्स-इंधन मॉडेल्स आणत आहेत. याशिवाय, आसाम पेट्रो-केमिकल्स रोज ७०० टन मिथेनॉल तयार करत असून त्याची किंमत केवळ २०-२२ रुपये प्रतिलीटर आहे, तर डिझेल ११० रुपयांच्या आसपास आहे. मिथेनॉल आणि आयसो-ब्युटेनॉलच्या वापरामुळे भारताची तब्बल २ लाख कोटी रुपयांची जीवाश्म इंधन आयात पूर्णपणे थांबू शकते आणि प्रदूषणही कमी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## उदगीर येथे दुकानांना भीषण आग; लाखोंचे साहित्य जळून भस्मसात

**उदगीर/प्रतिनिधी :** उदगीर-जळकोट रोडवरील व्यावसायिक दुकानांना गुरुवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास अचानक आग लागली. आगीत किराणा दुकान, गॅरेज आणि मच्छी विक्रेत्यांचे लाखो रुपयांचे साहित्य भस्मसात झाले. आगीची माहिती समजताच परिसरातील नागरिकांनी धाव घेतली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

उदगीर-जळकोट रोडवरील व्यावसायिक दुकानांना आग लागली. काही वेळातच रौद्ररूप धारण केले. किराणा दुकानातील वस्तू आणि शेजारील गॅरेजमधील तेल, ग्रीस व इतर ज्वलनशील पदार्थामुळे आग वेगाने पसरली आणि शेजारील दुकानांनाही कवेत घेतले. नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाची गाडी येईपर्यंत तरुण, नागरिकांनी आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू केले. तसेच दुकानदारांचे नुकसान कमी व्हावे म्हणून दुकानातील जमेल तितके साहित्य सुरक्षित बाहेर काढण्यासाठी मदत केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी धाव घेतली. तसेच नगरपालिकेचे अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले.

## बार्शी रोडवरून दुचाकीची चोरी

**लातूर/प्रतिनिधी :** येथील इंडिया नगर भागातील रहिवासी इरफान इक्बाल शेख यांची २० हजार रुपये किमतीची होंडा युनिकॉर्न मोटारसायकल (एमएच २४ सीसी ५०२६) अज्ञात चोराने चोरून नेल्याची घटना घडली आहे. इरफान शेख हे भाजीपाला घेण्यासाठी पाण्याचा टाकी परिसरातील होंडा शोरूमसमोर दुचाकी पार्क करून गेले असता ही चोरी झाली. याप्रकरणी ६ जुलै रोजी एमआयडीसी पोलिस ठाण्यात अज्ञात चोराविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सपोउपनि केंद्रे करीत आहेत.

## दुहेरी खून प्रकरणात तीन आरोपींना जन्मठेप

**लातूर/प्रतिनिधी :** पोलीस स्टेशन कासार सिरसी हद्दीतील मौजे उस्तुरी येथे वाटणीच्या वादातून घडलेल्या दुहेरी खून प्रकरणात अतिरिक्त सत्र न्यायाधीश, निलंगा श्री. एस. बी. पवार यांनी दि. ०९ जुलै २०२६ रोजी महत्त्वपूर्ण निकाल देत तिन्ही आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. कासार सिरसी पोलिसांनी शास्त्रशुद्ध तपास, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब, आरोपी विरुद्ध भक्कम पुरावा न्यायालयात सादर करण्यात आला होता.

या प्रकरणात मौजे उस्तुरी येथील सुरेश आन्यप्पा बिराजदार हे आपल्या मुलांसह शेतात काम करत असताना, वाटणीच्या कारणावरून आरोपींनी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात सुरेश आन्यप्पा बिराजदार व त्यांचा मुलगा साहिल सुरेश बिराजदार यांचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा मुलगा गणेश सुरेश बिराजदार गंभीर जखमी झाला.

या घटनेनंतर मयत सुरेश बिराजदार यांच्या मेहुण्याने पोलीस स्टेशन कासार सिरसी येथे बस्वराज आन्यप्पा बिराजदार, लखन आन्यप्पा बिराजदार व सुनिल आन्यप्पा बिराजदार (रा. उस्तुरी) यांच्याविरुद्ध फिर्याद दिली. त्यानुसार कासार सिरसी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १७/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०३, १०९ व ३(५) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस स्टेशन कासार सिरसीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड यांनी अत्यंत बारकाईने केला. तपासादरम्यान प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब, घटनास्थळावरील पुरावे तसेच इतर महत्त्वाचे साक्षीपुरावे संकलित करून आरोपींविरुद्ध सबळ दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

खटल्यादरम्यान सरकार पक्षातर्फे एकूण सहा साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदारांची सुसंगत साक्ष व तपासातील पुरावे न्यायालयाने ग्राह्य धरले. सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता कपिल व्ही. पंढरीकर यांनी प्रभावी युक्तिवाद केला. त्यांना जिल्हा सरकारी अभियोक्ता एस. व्ही. देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले.

मा. अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री. एस. बी. पवार यांनी आरोपी बस्वराज आन्यप्पा बिराजदार, लखन आन्यप्पा बिराजदार ३)सुनिल आन्यप्पा बिराजदार (सर्व रा. उस्तुरी) या तिन्ही आरोपींना भारतीय न्याय संहिता कलम १०३ सह ३(५) अंतर्गत प्रत्येकी जन्मठेप व १०,००० दंड, तसेच कलम १०९ सह ३(५) अंतर्गत सात वर्षे सक्त कारावास व ५,००० दंड अशी शिक्षा सुनावली.

या प्रकरणात सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता कपिल व्ही. पंढरीकर यांनी प्रभावीपणे कामकाज पाहिले. त्यांना कोर्ट पैरवी कर्मचारी आय. डी. चेळकर व कार्यालय सहाय्यक एच. जी. बिरादार (कनिष्ठ लिपिक) यांनी सहकार्य केले. कासार सिरसी पोलिसांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनात केलेल्या काटेकोर तपासामुळे आणि सरकार पक्षाने न्यायालयात सादर केलेल्या ठोस पुराव्यामुळे गंभीर दुहेरी खून प्रकरणात आरोपींना कठोर शिक्षा होण्यास मदत झाली असून, हा निकाल गंभीर गुन्ह्यांमध्ये प्रभावी तपास व सक्षम न्यायालयीन पाठपुराव्याचे महत्त्व अधोरेखित करणारा ठरला आहे.

## लातूर स्थानिक गुन्हे शाखेची उल्लेखनीय कामगिरी

### २१ गंभीर गुन्ह्यांची उकल, ५० लाखांचा मुद्देमाल जप्त

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर स्थानिक गुन्हे शाखेने जून २०२६ महिन्यात चोरी, रोड रॉबरी, दरोडा तसेच चैन स्नॅचिंगसारख्या गंभीर स्वरूपाच्या एकूण २१ गुन्ह्यांची यशस्वी उकल करत सुमारे ५० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस उपमहानिरीक्षक उमाप आणि जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचे प्रशंसापत्र देऊन अभिनंदन केले.

पोलीस अधीक्षक कार्यालयात आयोजित कार्यक्रमात सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने आणि त्यांच्या संपूर्ण पथकाला उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रशंसापत्र प्रदान करण्यात आले. यावेळी अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

याच वेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने यांच्या विशेष कामगिरीचाही गौरव करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत असताना मुरूड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याच्या समांतर तपासात त्यांनी तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे दोन आरोपींना अटक केली. त्यांच्या चौकशीतून लातूर जिल्ह्यातील सोलार पॅनल व कॉपर वायर चोरीचे तब्बल १३ गुन्हे उघडकीस आले. या कारवाईत १६ लाख ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी त्यांना स्वतंत्र प्रशंसापत्र देऊन गौरविले.

यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केलेला प्रभावी तपास, गुन्ह्यांची तातडीने उकल, आरोपींचा शोध घेण्यासाठी केलेले तांत्रिक विश्लेषण आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांचे विशेष कौतुक केले. अशा प्रभावी कारवायांमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ होत असून, लातूर पोलीस दलाच्या कार्यक्षमतेबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.फोटो कॅप्शन : पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचा प्रशंसापत्र देऊन गौरव करताना पोलीस उपमहानिरीक्षक उमाप, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर व अन्य अधिकारी.



## प्रभात किरणे

सबंध तोडती,बोलता खरं
जवळची होती,जातात दूर
खरं हेच, सुखाची मोती
स्वार्था विना जपावी नाती

- इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



राज्यातील शिक्षक संघटनांचे शाळा बंद आंदोलन..........

## चिमटा



दयाचा

भूकंपाने मनात भीती
निर्माण होत आहे!!
झोपडीवाले निवांत तर
बिल्डिंगवाले काळजीत आहेत!!
लातूरकरांना भूकंपाचा अनुभव
नाव नाही!!!
त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही..

## लातूर जिल्हा परिषदेत सत्ताधाऱ्यांचा मनमानी कारभार;

### निधीची उधळपट्टी आणि जनतेचे प्रश्न वाऱ्यावर - काँग्रेसचा घणाघात




**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्हा परिषदेमध्ये सध्या सत्ताधारी गटाकडून मनमानी कारभार सुरू असून, ग्रामीण भागातील जनतेचे पाण्याचे, आरोग्याचे आणि शिक्षणाचे प्रश्न पूर्णपणे वाऱ्यावर सोडण्यात आल्याचा गंभीर आरोप काँग्रेसने केला आहे. जिल्हा परिषद काँग्रेसच्या गटनेत्या आशाताई भिसे यांनी आज काँग्रेस भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत सत्ताधाऱ्यांच्या कारभाराचे अक्षरशः वाभाडे काढले. गेली चार वर्षे जिल्हा परिषदेचा कारभार प्रशासकांच्या हाती होता. मात्र आता लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतरही प्रशासनावर सत्ताधाऱ्यांचा कोणाचाही वचक राहिला नसून, सर्वसाधारण सभा घेण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप आशाताई भिसे यांनी केला.

सभांना बगल आणि अधिकाऱ्यांची दांडी लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतर जनतेचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सर्वसाधारण सभा वेळेवर होणे अपेक्षित असते. मात्र, आचारसंहितेचे कारण पुढे करत सभा घेण्यास टाळाटाळ केली गेली. अनेक महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर केवळ एकच विशेष सर्वसाधारण सभा घेण्यात आली. त्यातही पहिल्या स्थायी समितीच्या सभेमध्ये राज्य शासनाचे महत्त्वाचे विभागप्रमुख (कजऊ) उपस्थित न राहता त्यांच्याऐवजी कनिष्ठ कर्मचाऱ्यांना पाठवले जाते. यावरून प्रशासकीय पातळीवर किती ढिसाळ कारभार सुरू आहे, हे उघड होते. प्रत्येक बैठकीला वेगवेगळे अधिकारी उपस्थित राहिल्यामुळे प्रश्न दुर्लक्षित राहत आहेत.

पाणीटंचाई आणि रस्त्यांची दुरवस्था जिल्ह्यात सध्या दुष्काळसदृश परिस्थिती आणि तीव्र पाणीटंचाईचे मोठे संकट उभे असताना प्रशासनाकडे उपाययोजनांचा पूर्ण अभाव आहे. 'जल जीवन मिशन' आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यात मोठा गोंधळ सुरू असून अनेक कामे अपूर्ण अवस्थेत पडून आहेत. जनता पाण्यासाठी वणवण भटकत असताना प्रशासन मात्र एकमेकांवर जबाबदारी ढकलण्यात मग्न आहे.

यासोबतच, जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. १५ व्या वित्त आयोगातून कोट्यवधी रुपयांचा निधी प्राप्त होऊनही तो योग्य वेळी व ठिकाणी खर्च करण्यात सत्ताधारी अपयशी ठरले आहेत. आरोग्य आणि शिक्षणाचा उडाला बोजवारा ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये (झक्) एएनएम (-छच्) आणि चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याने गरोदर महिला व रुग्णांना उपचारासाठी थेट लातूर शहरात यावे लागत आहे. दुसरीकडे, शिक्षणाची अवस्थाही अत्यंत दयनीय झाली आहे. जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांची अवस्था बिकट असून पावसाळ्यात शाळांचे छत गळत असल्याचा व्हिडीओच त्यांनी यावेळी पत्रकारांसमोर मांडला. शाळांच्या दुरुस्तीकडे आणि शिक्षकांच्या भरतीकडे प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे.

सत्ताधाऱ्यांची उधळपट्टी; विरोधकांना मात्र सतरंजी! जनतेच्या ज्वलंत प्रश्नांसाठी निधी उपलब्ध नसताना, दुसरीकडे जिल्हा परिषद अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या केबिनच्या नूतनीकरणासाठी लाखो रुपयांची उधळपट्टी केली जात आहे. यशवंतराव चव्हाण सभागृह प्रशासकीय इमारत दुरुस्ती आणि महागड्या साऊंड सिस्टीमवर ५० लाखांचा घाट घातला जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. लोकशाहीत महत्त्वाचा भाग असलेल्या विरोधी पक्षाला (महाविकास आघाडीला) साधे बसण्यासाठी केबिनही देण्यात आलेले नाही. ग्रामीण भागातील जनता विरोधी पक्षातील सदस्यांना त्यांच्या कामाच्या संदर्भामध्ये भेटीसाठी आल्यानंतर त्यांचे गाऱ्हाणे ऐकून घ्यायला विरोधी पक्षाच्या सदस्यांवर सतरंजी टाकून बसण्याची वेळ आली असून, हा लोकशाहीचा व विरोधकांचा मोठा अपमान असल्याचे भिसे म्हणाल्या.

प्रशासनाला इशारा महिला व शेती विभागाच्या योजनांचा निधी प्रत्यक्ष अल्प प्रमाणात लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. सत्ताधाऱ्यांनी केवळ राजकारण आणि निधीची मनमानी उधळपट्टी न करता, ग्रामीण भागातील जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी जोरदार मागणी आणि कडक इशारा काँग्रेसच्या वतीने या पत्रकार परिषदेत देण्यात आला आहे. या पत्रकार परिषदेला जिल्हा परिषद सदस्य महादेव मस्के, जिल्हा परिषद सदस्या राजश्री देशमुख ताई सोशल मीडिया विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी उपस्थित होते.

## शाळांच्या परिसरात कचरा टाकू नका, सार्वजनिक ठिकाणी लघुशंका टाळावी - महापौरांचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** आपले लातूर शहर स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी ठेवण्यासाठी शाळा व महाविद्यालयीन परिसर तसेच सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकू नये, लघुशंका करू नये, असे आवाहन महापौर जयश्रीताई सोनकांबळे,आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी केले आहे.

शहरातील अनेक सार्वजनिक ठिकाणी नागरिक लघुशंका करतात. घरातील कचरा सार्वजनिक ठिकाणी आणून टाकला जातो.अशा ठिकाणी कचरा साठल्यामुळे परिसर अस्वच्छ होऊन दुर्गंधी, डासांची वाढ, संसर्गजन्य आजारांचा प्रसार होतो. विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते.त्यामुळे शहरातील नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन महापौर व आयुक्तांनी केले आहे.

शहर स्वच्छ ठेवण्यामध्ये नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो. त्यामुळे नागरिकांनी लघुशंकेसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहांचा वापर करावा. सार्वजनिक आरोग्यास बाधा आणणारी कृती टाळावी. शाळांच्या परिसरात कचरा साठवला जाणार नाही याची दक्षता घ्यावी. आपल्या घरातील ओला व सुका कचऱ्याचे योग्य पद्धतीने वर्गीकरण करून मनपाला सहकार्य करावे. सार्वजनिक ठिकाणी, शैक्षणिक संस्था तसेच शासकीय मालमत्ता सुरक्षित ठेवण्यासाठी नागरिकांनी जबाबदारीने वागावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

स्वच्छ व निरोगी परिसर हा सुदृढ आयोगाचा पाया आहे. आपल्या पाल्यांना व विद्यार्थ्यांना स्वच्छ आणि सुरक्षित वातावरण मिळावे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. शहरातील नागरिकांनी स्वच्छतेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. महानगरपालिकेच्या स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही महापौर सोनकांबळे व आयुक्त कुलकर्णी यांनी केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## पुन्हा संकटाची चाहूल

थोड्या दिवसासाठी युद्ध विराम झाल्याने जनतेला बरे वाटले. आता युद्ध विराम कायमचा होईल असे वाटत असताना पुन्हा उफाळला आहे. अमेरिका आणि इराणमध्ये सुरू असणारा संघर्ष काही केल्या थांबण्याचे नाव घेत नाही. या दोन्ही देशांमध्ये बहुप्रतिक्षित असा शांतता आणि युद्धबंदी करार झाला असला तरीही संघर्षाला मिळालेला विराम फक्त कागदोपत्रीच स्पष्ट दिसत येत आहे. कारण ठरते ते धुमसणारी संघर्षाची ठिणगी. अमेरिका आणि इराणमध्ये झालेला अंतरिम करार संपुष्टात आल्याचे सांगण्याच्या काही तासांतच अमेरिकेने इराणवर भीषण हवाई हल्ले केले. अमेरिकी सेंट्रल कमांडच्या माहितीनुसार, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या जहाजांना सुरक्षिततेची हमी देत इराणची हल्ला करण्याची क्षमता पूर्णपणे कमकुवत करणे हा यामागचा मुख्य हेतू असल्याचे सांगण्यात येत आहे. अमेरिकेने केलेल्या या हल्ल्यानंतर पुन्हा एकदा आखाती देशांमध्ये तणाव वाढला असून, इराणने सुद्धा अमेरिकेला इराणच्या दक्षिण पूर्वेकडे असणाऱ्या ईरानशहर विमानतळावर एक मोठा हल्ला झाला. ज्यानंतर तेथील सरकारी वृत्तसंस्थाच्या माहितीनुसार या हल्ल्यामध्ये काही मृत्यूंची नोंद करण्यात आली. या हल्ल्यानंतर इराणमधील सदर भागात सुरक्षा वाढवण्यात आली. दरम्यान अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या हल्ल्याच्या काही क्षणांपूर्वीच इराणसोबत आता कोणतीही चर्चा होणार नाही असेही स्पष्ट केल्याने या घटनांचे पडसाद जागतिक स्तरावर उमटण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अमेरिकेच्या हल्ल्यानंतर संपूर्ण दक्षिण इरामध्ये एकच खळबळ माजल्याचे पाहायला मिळाले. होर्मुझच्या सामुद्रधुनीपासून ओमानच्या खाडीपर्यंत व्यापलेल्या बुशहर, सीरिक, अबू मुसा बेट, जास्क बेट, चाबहार सारख्या शहरांमध्येसुद्धा स्फोटांचे आवाज ऐकू आले. इराणमधील सर्वात महत्त्वाचे बंदर असणाऱ्या बंदर अब्बास इथे आठ स्फोट झाले. ज्यानंतर इथे एअर डिफेन्स सिस्टीमसुद्धा सक्रीय करण्यात आली. या सर्व घडामोडींमुळं इराणच्या अनेक भागांमध्ये वीजपुरवठा खंडित झाला. अमेरिका इराण संघर्ष मिटण्याच्या वळणावर असतानाच एकाएकी पुन्हा हे हल्ले होण्यामागचे कारण म्हणजे होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये व्यावसायिक जहाजांवर होणारे हल्ले. ज्यासाठी अमेरिकेने थेट इराणवर दोषारोपण केले असून, जगभरातील तेलपुरवठ्याचा पाचवा भाग हा याच वाटेने पुढे जातो. ज्यामुळे हे क्षेत्र सुरक्षित ठेवणे अतिशय महत्त्वाचे समजले जाते. मुळात या युद्धाचा परिणाम जगावर होत आहे. इराण हा अजूनही इंधन पुरविण्याचा प्रयत्नात आहे. होर्मुझ सामुद्रधुनी येथून इंधनाचे जहाज पास करण्याची खबरदारी इराण घेत आहे. या भागात शांतता नांदत असताना अमेरिकेने कुरापत काढून हल्ले केले आहेत. याचा परिणाम आता जगावर होणार आहे. युद्धामुळे जगात अशांतता निर्माण झाली. महागाई वाढली आहे. तरी जगातील इतर देश अमेरिकेवर दबाव निर्माण करीत नाहीत. जगात शांतता निर्माण करणाऱ्या जागतिक संघटना गप्प दिसून येत आहेत. त्याच प्रमाणे युद्ध अमेरिका व इराण दरम्यान चालू असले तरी याचा परिणाम जगात होत आहे. भारतात तर मोठा परिणाम दिसून येत आहे. इंधनाचे दर वाढले की, आपोआप महागाई वाढते. हे सुत्र लक्षात घेता भारत या बाबतीत स्वयंपुर्ण होताना दिसून येत आहे. इथेलॉन पेट्रोलमध्ये काही प्रमाणात मिसळण्याचा विचार चालू आहे. या बाबत भारतात काही प्रमाणात विरोध होत आहे. एकतर गाड्या चालविणे परवडणारे नाही. त्यात पेट्रोलमध्ये इथेलॉन मिसळण्याचा विचार केल्यास वाहानाचे इंजिन खराब होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेता भारतातील नागरिक विचारात पडले आहेत. एक तर इलेक्ट्रिक गाड्या परवडणाऱ्या नाहीत. दुसरे असे की, इंधन खिशाला परवडत नाही. अशा दुहेरी संकटात वाहाने वापरणारे या युद्धामुळे सापडले आहेत. ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा सत्ता हस्तगत केल्यापासून जगात अशांतता निर्माण होताना दिसून येत आहे. आपलीच जगावर सत्ता चालावी अशा महासत्ताधिस असणाऱ्यांना अमेरिकेला वाटत आहे हे अयोग्य आहे. महासत्ताधिश समजल्या जाणाऱ्या अमेरिकेला इराण सारखा लहान देश झुंजवित आहे. वास्तविक इराणला कोणीही मदत करीत नाही. तो अमेरिकेशी धाडसाने लढत आहे हे प्रशांसनिय आहे. या युद्धात अमेरिकेची साथ दिली जात नाही तरी अमेरिकेच्या तालावर नाचणारी देश अमेरिकेला सहकार्य करीत आहेत. ईस्त्राइल या देशाला अमेरिकेशी सहकार्य करण्याची गरज नव्हती. अमेरिकेनी इराणच्या भोवती जे देश आहेत त्याला आपलेसे केले आहे. त्यांना आर्थिक मदत केली आहे. पाकिस्तान सारखा देश अमेरिकेचे गुणगाण गाताना दिसून येत आहे. अमेरिकेने समजुतीपनाने वागले नाही तर जागतिक युद्धाचा भडका उडू शकतो. युद्धामुळे सर्वच जगात अशांतात निर्माण झालेली आहे. सर्वांना इंधन लागते. इंधनाला पर्याय आता जगा शोधत आहे. आता पर्यंत शोधण्याची गरज नव्हती. मुळात सौर ऊर्जा हा सर्वोत्तम पर्याय आहे. त्याला चालना दिली जात नाही. यामागील कारणे ही तशीच आहेत. आज मोठ-मोठे उद्योगपती भिखेला लागतील. सौरऊर्जा मोफत लाभते. इलेक्ट्रिक गाड्या बाजारात आल्याने अनेकांच्या खर्चात बचत झालेली आहे. चारचाकी गाड्या सुद्धा इलेक्ट्रिक बनविल्या जात आहेत. त्यामुळे देशात ज्या मोठ्या नावाजलेल्या दोन व चार चाकी गाड्या बनविणाऱ्या व पेट्रोल-डिझेलवर चालणाऱ्या निर्मात्यांचा व्यावसाय बंद पडू शकतो. यामुळे लवकर पर्याय शोधला जात नाही. असे दिसून येते. भारत सोडला तर जगात सौरऊर्जे चा वापर अधिक होतो. जो पर्यंत ट्रम्प आहेत तो पर्यंत जगात शांतता नांदणार नाही. हे लक्षात घेता आता भारताने स्वयंपुर्ण होणे काळाची गरज आहे. भारताने मोठया मंडळीचा विचार करण्याबरोबर जनसामान्य नागरिकांचा विचार केला पाहिजे. युद्ध आता लवकर शांत होईल असे वाटत नाही. युद्धाला इराण सज्ज आहे. तोडीसतोड प्रतित्तर देत आहे. यामुळे इंधनाचे दर आता कमी होण्याची संभावना होती ती मावळली आहे. महागाई कमी होईल असे वाटत होते ती आशा मावळली आहे. त्यामुळे भारतीयांवर इंधनाचे संकट अटळ आहे हे लक्षात घेता आगामी वाटचाल करावी लागणार आहे.

# मानसिक आजारांचा एकमेव उपाय - आत्मा परमात्म्याचे ज्ञान

मनाच्या विकृतीमुळे निर्माण होणारे मानसिक आजार जसे ताण (टेंशन), नैराश्य (डिप्रेशन), चिंता (न्झायटी), झोप न येणे इत्यादी आज जवळजवळ प्रत्येक व्यक्ती भोगत आहे. याचे मूळ कारण म्हणजे मन आणि बुद्धीचा असमतोल आहे. या रोगाचा सर्वोच्च सर्जन म्हणजे परमात्मा शिव आहे. जगातील कोणत्याही सर्जनकडून याचा इलाज शक्य नाही. याचे एकमेव औषध म्हणजे आत्म्याचे मेडिटेशन किंवा सहज राजयोग, जे कि परमात्म्याशिवाय इतर कोणीही शिकवू शकत नाही.

मन अत्यंत सूक्ष्म, अदृश्य आणि चंचल आहे. त्याच्या अस्थिर स्वभावामुळे त्याची तुलना वाऱ्याशी, बेलगाम घोड्याशी आणि माकडाशी केली जाते.मन हे कोणतेही स्थूल इंद्रिय नाही की त्यावर औषधाचा परिणाम होईल. आत्म्याचे पिता ज्ञानसूर्य शिव परमात्म्याशी आपले मन जोडल्याने आत्म्यात ऊर्जा भरते. त्यावेळी मनातील विकार मुळापासून बाहेर पडू लागतात आणि मन स्थिर होते. आज आपले मन कमजोर आणि अनियंत्रित आहे कारण आपल्याला ते सुदृढ बनविण्याचा मार्ग माहित नाही. त्यामुळे आपण मानसिक आजारांच्या विळख्यात अडकतो. अनेक जन्म घेत आलेल्या आपण सर्व आत्म्यांना कलियुगाच्या शेवटी परमपिता परमात्मा शिव स्वतः या सृष्टीवर अवतरित होऊन राजयोग आणि खऱ्या गीता ज्ञानाद्वारे मन नियंत्रित करण्याची आणि त्यामध्ये इच्छाशक्ती (विल पॉवर) भरण्याची पद्धत सांगतात. श्रीमद्भगवद्गीतेत अर्जुन म्हणतो की हे मन बेलगाम घोड्यासारखे इंद्रियांना भोगांकडे खेचते. ते खूप हट्टी आणि बलवान आहे, मी त्याला कसे नियंत्रित करू? त्यावर भगवान उत्तर देतात, अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते म्हणजेच वारंवार भटकणाऱ्या मनाला नियंत्रित करून अभ्यास आणि निरंतर वैराग्याच्या आधाराने माझ्यामध्ये एकाग्र कर तरच ते एक दिवस नियंत्रणात येईल.यासाठी आपल्या मनाला (अर्थातच मन-बुद्धीला) सर्व इंद्रिय आणि अनेक विचारांपासून हटवून ज्योतिर्बिंदू आत्म्यामध्ये केंद्रित करण्याचा सतत सराव करावा लागतो, यालाच राजयोग असे म्हणतात. याच्या नियमित अभ्यासाने मन शक्तिशाली, सुदृढ आणि नियंत्रित होते आणि काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार यांसारखे विकार नष्ट होतात. आत्म्याचे दिव्य गुण आणि शक्ती जागृत होते आणि आत्मा शुद्ध, पवित्र, निर्विकारी, निराकार अवस्थेत जाऊन देवपद प्राप्त करते. मन निःसंकल्प अवस्थेत पोहोचून 'अमन' होते आणि अमर्याद शांतता व अतिंद्रीय सुखाचा अनुभव घेते.

विचार करा, जड सूक्ष्म अणूमध्ये इतकी शक्ती आहे की तो अणुबॉम्ब बनून मोठा विनाश करू शकतो, तर चैतन्य परमाणूरूप आत्म्यामधील ती असीम शक्ती तेव्हाच अनुभवता येईल जेव्हा आपण भारताच्या या प्राचीन राजयोगाची ओळख करून घेऊ. मन आणि बुद्धीची एकाग्रता आत्म्याला शक्तिशाली बनवते आणि मन निरोगी होते. मन निरोगी नसेल तर शरीरही निरोगी राहू शकत नाही. म्हणूनच गीतेत भगवान अर्जुनाला स्थितप्रज्ञ, आत्मनिष्ठ आणि आत्मवान होण्यास सांगतात. तीच अवस्था देवपद आहे. मनुष्याचे चंचल मन नियंत्रित झाले तर मनुष्य देवता बनतो ,ज्याची पूजा मंदिरामध्ये होते. जसे अणूमध्ये दडलेली अणुऊर्जा वीज निर्माण करू शकते आणि सूर्याची ऊर्जा देखील त्याच अणुऊर्जे वर आधारित आहे, तसेच आत्मारूपी परमाणूमध्ये योगाची ऊर्जा परमात्म्याने शिकवलेल्या राजयोगामुळेच निर्माण होते. हाच आत्म्याची शक्ती जागृत करण्याचा आणि परमात्म्याशी एकरूप होण्याचा एकमेव मार्ग आहे. हेच व्यसन आणि मानसिक विकारांपासून मुक्त होण्याचे एकमेव औषध आहे, जे भगवान शिव आध्यात्मिक विद्यालयाद्वारे विनामूल्य देत आहेत. सर्वांनी याचा लाभ घ्यावा, कारण आत्ता नाही तर कधीच नाही.

भक्तिमार्गात म्हणतात - रामाची सीता रावणाने पळवली. सूक्ष्म अर्थाने मन- बुद्धी रूपी आत्मा हीच सीता आहे आणि परमपिता परमात्मा म्हणजेच राम. जो रामापासून दूर गेला आहे, त्याने पुन्हा रामाशी एकरूप व्हावे. मनाच्या आजाराचे मूळ कारण म्हणजे परमात्म्यापासून विभक्त होणे. त्याचा उपाय म्हणजे परमात्म्याशी योग. जोपर्यंत मन आपल्या खऱ्या अस्तित्वाशी (हस्तीशी) जोडले जात नाही, तोपर्यंत ते आजारीच राहते. म्हणून असे म्हटले जाते की आत्मा आणि परमात्मा खूप काळ वेगळे राहिले, पण जेव्हा सतगुरू मिळतो तेव्हा सुंदर मिलन घडते(आत्मा परमात्मा दूर रहे बहुकाल सुंदर मेला सज गया जब सतगुरु मिला दलाल). आता सांगा रावण कोण? नक्कीच म्हणावे की हे तेच मनुष्य गुरु आहेत ज्यांनी साधूचा वेष धारण केला आहे आणि खोटेपणाची सीमा ओलांडून जगाला नरकासारख्या अवस्थेत नेले आहे. संपूर्ण जगासाठी, विशेषतः भारतासाठी, हे मोठ्या दुःखाचे कारण आहे. या गुरूंनी दाखवलेल्या चुकीच्या मार्गामुळे अंध भक्त त्यांचे बळी झाले आहेत. आता त्यांना याचा हिशोब द्यावा लागेल. त्यांनी स्वतः ला (शिवोहम)शिव समजून. जगाला उलट दिशेने नेले आहे . हिंदीमध्ये एक म्हण आहे, झूठै लेना झूठै देना झूठै भोजन झूठ चबे ना अर्थात खोटे घेणे, खोटे देणे, खोटे बोलणे जीवनातील प्रत्येक कर्मात खोटेपणा भरलेला आहे, सत्य अजिबात नाही। त्यांनी खोटे ज्ञान पसरवले - जसे की भगवान सर्वव्यापी आहे, आत्मा ८४ लाख योनींमध्ये भ्रमण करते, कल्पाची आयु लाखो वर्षे आहे, आणि गीतेचे भगवान श्रीकृष्ण आहेत हे सर्व चुकीचे सांगितले गेले आहे. कृष्ण हे गीता मातेचे पुत्र आहेत, आणि त्यांना स्वतःच्या मातेचा पती मानणे हे किती मोठे पाप आहे. यापेक्षा मोठे पाप काय असू शकते? आणि या पापाचे फळ संपूर्ण जग भोगत आहे. हे स्वतःही मोठे पापी आहेत.

आता उठा, जागे व्हा भारतातील तरुणांनो! या राजकारणी आणि धर्मनेत्यांना प्रश्न विचारा. तुम्हीच देशाचे भविष्य आहात. पण तुम्हाला चारही बाजूंनी कमकुवत केले जात आहे - मानसिक, बौद्धिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि कौटुंबिक समस्यांनी. त्यांना माहित आहे की नवीन पिढी चारही बाजूंनी सक्षम झाली तर आमच्यासारख्यांची चालणार नाही. याची त्यांना भीती आहे. म्हणूनच त्यांनी समाज आणि तरुण पिढीला कमजोर आणि अपंगासारखे ठेवण्याचा मार्ग शोधला आहे. हाच उपाय या मनुष्य गुरूंनी स्वीकारला आहे. त्यामुळे आता उठा आणि त्यांना प्रश्न विचारा. उत्तर न मिळाल्यास विरोध करा. घाबरू नका, हार मानू नका. सत्याच्या बाजूने परमेश्वर स्वतः आहेत. या गुरु गोसाईंच्या चुकीच्या कृत्यांमुळे भारताची प्रतिष्ठा आणि संस्कृती कमी झाली आहे. आता पुढील पिढीसाठी काय उरले आहे, हे विचारणे खूप आवश्यक आहे.

आता वेळ आली आहे की या चुकीच्या मार्गावर गेलेल्या धर्मगुरूंना ओळखण्याची. ज्यांनी साधूचा वेष घेऊन रामाची सीता (म्हणजेच आत्मा) दूर नेऊन लोकांना अज्ञानात ठेवले आहे, त्यांना आता या माया रूपी बंधनातून मुक्त करून खरी स्वातंत्र्याची वाट दाखवणे आवश्यक आहे. यामुळेच भारत पुन्हा विश्वगुरू बनू शकतो. हे माया रूपी रावण भारताचे खरे शत्रू आहेत, त्यामुळे त्यांच्या विरोधात ठामपणे उभे राहणे गरजेचे आहे. रामाचे भक्त आणि रहीमचे बंदे असूनही अनेक जण अज्ञानामुळे सत्य पाहू शकत नाहीत. म्हणूनच सर्वोच्च परमात्म्याने गीतेत सांगितले आहे - सर्वधर्मान् परित्यज मामेकं शरणं व्रज, म्हणजे सर्व देहधारी धर्म सोडून मला शरण या. भारतवासीयांनी ऐकीव गोष्टींवर विश्वास ठेवून अनेकांना गुरु मानले आहे, पण सत्य लवकरच स्पष्ट होणार आहे. परमेश्वराच्या न्यायव्यवस्थेत उशीर असतो, पण अन्याय नसतो(भगवान के घर देर है अंधेर नहीं). आता सत्य आणि असत्य यातील फरक स्पष्ट होणारच आहे. पतितांना पवित्र करणारे, मुक्ती आणि जीवनमुक्ती देणारे, सद्गती देणारे गीतेचे भगवान शिव शंकर भोलेनाथ आपल्याला जो वारसा देतात त्यापासून कोणीही वंचित राहू नये.

आता अंधश्रद्धा आणि अंधविश्वासाचा जो दुर्गतीकडे नेणारा भक्ती मार्ग आहे तो संपेल, आणि ज्ञानाचा खरा मार्ग पुढे येईल. जे अर्धवट ज्ञान देणारे आणि लोकांना चुकीच्या मार्गावर नेणारे गुरु आहेत, त्यांचाही खरा उद्धार परमात्म्यामुळेच होईल. या सर्व चुकीच्या गोष्टी हळूहळू नष्ट होतील. या खोट्या आणि अज्ञानी धर्मगुरूंनी पसरवलेल्या अज्ञानामुळे भारतातील लोक कर्मभ्रष्ट आणि धर्मभ्रष्ट झाले आहेत, आणि या पाखंडी गुरूंच्या मागे जाऊन त्यांनी आपला स्वाभिमान गमावला आहे. आता यासाठी जबाबदार कोण? नक्कीच हे पाखंडी गुरुच आहेत. त्यांनी दिलेल्या ज्ञानाची आता नीट तपासणी करणे खूप आवश्यक आहे. शुद्ध आणि खरे ज्ञान परमपिता परमात्मा शिव देत आहेत, आणि त्याच खऱ्या गीता ज्ञानामुळे मनाचा खरा बदल होऊ शकतो. हाच महाभारताचा काळ आहे. आता सत्य आणि असत्य ओळखण्यासाठी आवाज उठवण्याची वेळ आली आहे, आणि ही जबाबदारी मीडिया आणि वर्तमानपत्रांवर आहे. आजच्या या पाखंडी गुरूंच्या खोटेपणाचे आणि मोठ्या पापांचे सर्व सत्य मीडिया आणि वर्तमान पत्रांच्या माध्यमातून जगासमोर उघड केले जाईल. जर शिवशक्ती पांडव सेना या कौरवांच्या खोटेपणाला सिद्ध करू शकली नाही, तर जग जे काही शिक्षा देईल ती आम्हाला मान्य असेल. आज संपूर्ण जग या पापींच्या मोठ्या पापांमुळे दुःख आणि अशांतीमध्ये जळत आहे. त्यामुळे शक्य तितक्या लवकर सत्य उघड करून दुःखी आणि अस्वस्थ आत्म्यांना शांती देणे, हेच तुमच्यासाठी ईश्वराकडून मिळणारे मोठे वरदान आहे. जर हे लक्षात ठेवले तर उन्नती, विसरलो तर विनाश अटळ आहे.

**आध्यात्मिक विद्यालय**
निलंगा, जिल्हा लातूर
पी. बी. के. रजनी
९१३६१६५६१३
पी. बी. के. कलप्पा भाई
९४६०२८८८८३

## कर्जमुक्ती आणि प्रोत्साहनपर लाभासाठी 'अॅग्रीस्टॅक' नोंदणी बंधनकारक

**बीड (जिमाका) :** राज्य सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ चा लाभ मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना आता आधार कार्ड आणि अॅग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक देणे बंधनकारक करण्यात आले आहे. या क्रमांकाशिवाय कर्जमाफी किंवा प्रोत्साहनपर योजनेचा लाभ मिळणार नाही. तरी बीड जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी ही नोंदणी तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार यांनी केले आहे.




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले अल्पमुदत पीक कर्ज, जे ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत होते आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत त्याची परतफेड झालेली नाही, अशा शेतकऱ्यांना लाभ मिळेल. जमीन धारणेचे क्षेत्र विचारात न घेता, एका किंवा अनेक बँकांमधील मिळून जास्तीत जास्त २ लाख रुपयांपर्यंतची मुद्दल व व्याजासह थकबाकी थेट कर्ज खात्यात जमा करून शेतकरी कर्जमुक्त केले जातील. तसेच ज्या नियमित कर्जदार शेतकऱ्यांनी २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्जाची उचल करून वेळेत परतफेड केली आहे, त्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे.

अॅग्रीस्टॅक नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी प्रथम आपला आधार कार्ड क्रमांक मोबाईल नंबरशी लिंक करणे आवश्यक आहे. आधार लिंक झाल्यानंतर अॅग्रीस्टॅक पोर्टलवर जाऊन आपली नोंदणी पूर्ण करावी. नोंदणीनंतर मिळणारा अॅग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक आपल्या पीक कर्ज खाते असलेल्या बँकेत जमा करावा. ज्या शेतकऱ्यांकडे आधीपासूनच हा नोंदणी क्रमांक उपलब्ध आहे, परंतु त्यांनी तो अद्याप बँकेत जमा केलेला नाही, त्यांनीही तो त्वरित बँकेकडे सुपूर्द करावा. या क्रमांकाशिवाय कोणत्याही परिस्थितीत योजनेचा लाभ खात्यात जमा होणार नसल्याने शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. असेही जिल्हा उपनिबंधक, बीड यांनी कळविले आहे.

# शिक्षेत दिरंगाई नको

एखाद्या उच्च न्यायालयाने एवढ्या मोठ्या संख्येने दोषींची फाशी कायम करण्याचे देशातील हे पहिले उदाहरण ठरले आहे. त्या शिक्षेची लवकर अंमलबजावणी झाली तरच न्याय मिळाला असे म्हणता येईल.अहमदाबादमध्ये झालेल्या स्फोट मालिकेतील दोषींची फाशीची व जन्मठेपेची शिक्षा अहमदाबाद उच्च न्यायालयाने कायम ठेवल्याने एका प्रकरणाचा निकाल लागला आहे. विशेष न्यायालयाच्या निकालास आव्हान देणारे सर्व अर्जही उच्च न्यायालयाने फेटाळले आहेत. २६ जुलै २००८ रोजी अहमदाबादच्या वेगवेगळ्या भागांत २१ बॉम्बद्वारे स्फोट घडवून आणण्यात आले होते. या स्फोटांमध्ये ५६ जण ठार तर २४६ जण जखमी झाले होते. मृतांच्या नातलगांना आणि जखमी व्यक्तींना पुढील मार्चपर्यंत नुकसानभरपाई देण्याचे आदेशही उच्च न्यायालयाने दिले आहेत. एवढा गंभीर गुन्हा घडूनही त्याचा खटला दीर्घकाळ रेंगाळला. यातून आपल्या या न्यायव्यस्थेतील दोष स्पष्ट होतो. २०१० च्या फेब्रुवारीत आरोपींवर आरोप निश्चित करण्यात आले; मात्र खटल्याचे कामकाज जुलै २०१२ मध्ये सुरू झाले. त्या नंतर १० वर्षांनी विशेष न्यायालयाने शिक्षा सुनावली. फाशीच्या शिक्षेस उच्च न्यायालयाचा दुजोरा मिळावा यासाठी सरकारने २०२२ च्या मार्चमध्ये अर्ज केला. त्याचा निकाल आता लागला आहे. अनेक निरपराध नागरिकांचे प्राण घेणार्या या गुन्ह्यातील आरोपींची शिक्षा कायम करण्यासाठी उच्च न्यायालयास वेळ का लागला अशी विचारणा न्यायालयाकडे करता येणे शक्य नाही. मात्र न्याय संस्थेने त्याचा विचार केला पाहिजे.

जरब बसावी

स्फोटांच्या मालिकेनंतर पोलिसांनी केलेली कारवाई 'वेगाने' केली असे म्हणावे लागेल.१६ ऑगस्टपर्यंत १० जणांना अटक करण्यात आली होती. मुफ्ति अबु बशर हा स्फोटांचा सूत्रधार असल्याचे पोलिसांनी सांगितले होते. या नंतरही अटक सत्र सुरू राहिले होते. विशेष न्यायालय पूर्वग्रह दूषित असल्याने खटला अन्यत्र हलवण्याची मागणी आरोपींनी केल्याने सर्वोच्च न्यायालयाने खटला चालवण्यास स्थगिती दिली. ती जवळपास दीड वर्षांनी उठवली गेली. विशेष न्यायालयात एकूण ७७ आरोपींविरुद्ध खटला चालला. पैकी २८ जणांची संशयाचा फायदा देत सुटका करण्यात आली. ३८ जणांना फाशी व ११ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. विशेष न्यायालयाने एका खटल्यात एवढ्या मोठ्या संख्येने फाशीची शिक्षा सुनावण्याचे देशातील हे पहिले उदाहरण ठरले. अहमदाबाद प्रमाणेच सुरतेतही स्फोट घडवण्याचा गुन्हेगारांचा बेत होता. तेथून पोलिसांनी १५ बॉम्ब ताब्यात घेऊन निकामी केले होते. ही घटनाही खटल्यात समाविष्ट होती. बंदी घातलेली 'सिमि' व त्यातून निर्माण झालेल्या 'इंडियन मुजाहिदीन' या संघटनेशी संबंधित असलेल्या या दोषींना ११ राज्यांतून पकडण्यात आले. गोध्रा हत्याकांडानंतर गुजरातेत मोठी दंगल उसळली होती. तिचा 'सूड' घेण्यासाठी या गुन्हेगारांनी अहमदाबादेत स्फोट घडवून आणले होते. स्फोटांनतर माध्यमांना पाठवलेल्या 'ई मेल'मध्ये 'हिंमत असल्यास आम्हाला रोखून दाखवा' अशी दर्पोक्ती करण्यात आली होती. साबरमती तुरुंगातून खंदक खोदून पळून जाण्याचाही प्रयत्न त्यांनी केला होता. ते मुजोर व निर्ढावलेले आहेत हे त्यावरून सिद्ध होते. गोध्राचे जळित कांड, नंतरची दंगल किंवा स्फोटांची मलिका; या सर्व प्रकरणांत सामान्यांचे बळी गेले. या स्फोट मालिकेमुळे आधी दंगलीत जे घडले ते योग्य होते अशी बहुसंख्याक समाजाची धारणा झाली. दहशतवादास रंग किंवा धर्म नसतो हे खरे असले तरी या घटनांचा तत्कालीन राज्य सरकारला राजकीय लाभ झाला होता. सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तेव्हा गुजरातचे मुख्यमंत्री होते. स्फोटांत जे मरण पावले त्यांचे नातलग आणि तेव्हा जखमी झालेल्या व्यक्ती यांच्या मनातील जखमा या निकालाने पुन्हा उघड्या झाल्या असल्यास नवल नाही. ताज्या निकालाबद्दल त्यांनी अपेक्षेनुसार समाधान व्यक्त केले आहे; परंतु सर्व आरोपी त्यास सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार आहेत. तो खटला किती काळ रेंगाळेल हे सांगता येत नाही. जोपर्यंत सर्व दोषींना फाशी दिली जात नाही तोपर्यंत स्फोटातील बळींना 'न्याय' मिळाला असे म्हणता येत नाही. गुन्हेगारांना जरब बसेल अशा शिक्षेची अंमलबजावणी त्वरित होणे गरजेचे आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समताधिष्ठित भारताच्या निर्मितीसाठी प्रेरणादायी - राज्यपाल जिष्णु देव वर्मा

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्याय, समता आणि वंचित घटकांच्या उत्थानासाठी आयुष्यभर संघर्ष केला. समाजातील वंचित आणि उपेक्षित घटकांना शिक्षण, सन्मान, समान संधी आणि न्याय मिळावा यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. डॉ आंबेडकर यांचे विचार समताधिष्टीत भारताच्या निर्मितीसाठी मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज येथे केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ८१ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. राज्यपालांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वारसा आपल्याला समाजातील विषमता, जातीयवाद, उच्च-नीचतेची भावना तसेच स्त्री-पुरुष भेदभाव मिटवण्याचा संदेश देतो. समाजातील प्रत्येक व्यक्ती सक्षम आणि सशक्त व्हावी यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येकाला समान संधी आणि आत्मसन्मान देणारा भारत घडविणे हीच डॉ. आंबेडकरांना खरी आदरांजली ठरेल.

'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत' या संकल्पना साकार करण्यासाठी तसेच भारताला जगातील तिसरी अर्थव्यवस्था बनविण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विकास सर्वसमावेशक असणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटक विकासाच्या प्रवाहात सहभागी झाल्यास हे ध्येय सध्या होईल, असेही राज्यपालांनी सांगितले.

यावेळी राज्यपालांच्या हस्ते विधान परिषदेच्या माजी उपसभापती डॉ नीलम गोर्हे व उद्योजक पद्मश्री डॉ अशोक खाडे यांना सोसायटीतर्फे देण्यात येणारा 'भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार' प्रदान करण्यात आला. त्याबाबत राज्यपाल म्हणाले की, समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान केल्याने इतरांनाही उत्कृष्ट कार्य करण्याची; तसेच राष्ट्र आणि समाजकार्याला वाहून घेण्याची प्रेरणा मिळते. अशा पुरस्कारांमुळे समाजात सकारात्मक विचार, परिश्रमाची वृत्ती आणि राष्ट्रसेवेची भावना अधिक दृढ होते.

कार्यक्रमाला केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री तथा पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष रामदास आठवले, भदंत डॉ. राहुल बोधी महाथेरो, सोसायटीचे विश्वस्त अॅड. उज्ज्वल निकम, विश्वस्त अॅड. बी. के. बर्वे, डॉ वेंकट स्वामी व अरविंद सोनटक्के, सोसायटीचे सचिव डॉ. वासुदेव गाडे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सोसायटीच्या कार्यकारिणीचे सदस्य चंद्रशेखर कांबळे तसेच पुरस्काराचे मानकरी उपस्थित होते.

# काळजी नवजात आईची..

घरी बाळ जन्माला आले की घरातील प्रत्येक जण अगदी आनंदी असतो. बाळ कोणावर गेले आहे, त्याची काळजी कशी घ्यावी, त्याचे केस कसे आहेत वगैरें विषयांवर चर्चा करत असताना गेले नऊ महीने आईवर असलेला फोकस पूर्णपणे बाळाकडे गेलेला दिसतो. बालक नवजात असते तसे खरे तर आईही नवजातच असते. स्त्री आईच्या रूपाला बदललेली असते.
तिची पहिली कितीही बाळंतपणं झा-लेली असली तरी प्रत्येक गरोदरपण व प्रत्येक बाळंतपण वेगळे असते हे विसरून चालणारना-ही. स्त्री नुकतीच प्रसूत झालेली असते हा काळ आयुर्वेदिक दृष्ट्या खूप महत्त्वाचा असतो असे सांगितलेले आहे. पूर्वीच्या काळात ७-८ मुले झाल्यावरही स्त्री कणखरपणे उभी असायची, तिची कंबर दुखत नसे, तिची ताकद कमी झा-लेली नसे, तिचा उत्साह टिकून राहिलेला असे, अजून चार बाळं झाली तरी त्यांना आनंदाने सांभाळीन अशी शांतपणे सांगत असे.
पूर्वीच्या काळी सूतिका परिचर्येचे पालन व्यवस्थितपणे केले जात असे त्यामुळे कदाचित त्यांचे स्वास्थ्य व्यवस्थित रहात असावे. सध्या मात्र एका बाळंतपणानंतर दुसऱ्या बाळंतपणाचा विषय काढला तर ङ्गएक बाळंतपण झाले तेच ाहण वेदनाक्लेदनरक्तनिःस्रुतिविशेषशून्य शरीरत्वाच्च, तस्मात्तां यथोक्तेन विधिनोपचरेत् ।। ...चरक शारीरस्थान.फ्फ आयुर्वेदामध्ये नुकत्याच जन्म दिलेल्या आईला सूतिका असे म्हणतात, तिच्यावर केल्याजाणाऱ्या उपचारांना सूतिका परिचर्या म्हटले जाते. बालकाला जन्म दिल्यानंतर स्त्री नाजूक व संवेदनशील अवस्थेत असते.
तिने नऊ महिने गर्भाचे पोषण केलेले असते, त्याला आपल्या गर्भाशयात वाढवलेले असते, आपली संपूर्ण ऊर्जा बाळावर केंद्रित केलेली असते, बाळाला जन्म देण्याकरता कळा तरी सोसलेल्या असतात किंवा शरीरावर घाव तरी घेतलेले असतात. या सगळ्या प्रक्रियेत तिच्या शरीरातून भरपूर प्रमाणात रक्त गेलेले असते. साहजिकच तिच्या शरीरात कुठल्याही प्रकारची शक्ती किंवा प्रतिकारशक्ती उरलेली नसते. या काळात काळजी घेतली गेली नाही तर तिला निरनिराळे आजार होऊ शकतात. त्यामुळे आपल्याला अशा प्रकारच्या परिचर्येची गरज आहे की तिच्या शरीरातील ताकद भरून यायला व तिचे संरक्षण व्हायला मदत मिळू शकेल. बाळंतपणानंतरचे पहिले दहा दिवस अत्यंत महत्त्वाचे असतात. बाळाच्या झोपायच्या


पाण्याने अंघोळ करणे उत्तम. शक्य झाल्यास अंघोळीपूर्वी संतुलन अभ्यंग मसाज पावडर दुधात वा पाण्यात कालवून पूर्ण अंगाला लावणे अत्यंत उत्तम. हे शक्य नसेल तर जेथे जेथे स्ट्रेच मार्क येण्याची शक्यता असते तेथे असे उटणे नक्की लावावे.अंघोळ करून झाल्यावर



खूप आहे, परत त्याच अनुभवातून जायची माझी इच्छा नाहीफ असे शब्द ऐकू येतात. एकाच बाळंतपणाने तिचे संपूर्ण शरीर आमूलाग्र बदलून टाकलेले असते.
श्रीगुरु डॉ. बालाजी तांबे स्त्रियांच्या स्वास्थ्याकरता समाजात जागरूकता आणण्याचा प्रयत्न आयुष्यभर करत होते. ते नेहमी म्हणत असत, स्त्रीस्वास्थ्य व्यवस्थित टिकून राहिले तर सगळे कुटुंब व्यवस्थित राहू शकत. आयुर्वेदीय गर्भसंस्कार व गर्भधारणा या संकल्पनेतून बऱ्याच गोष्टी त्यांनी समाजासमोर आणल्या.
संतुलन आयुर्वेद फर्टिलिटी एक्पिरिअन्स म्हणजे स्त्री, पुरुष व कुटुंबाकरता नैसर्गिक व आयुर्वेदिक रित्या कशी गर्भधारणा होऊ शकेल, गर्भारपणात कशी काळजी घेता येईल व बाळंतपणात नवजात बालकाची व आईची काळजी कशी घेता येईल या सगळ्यांबद्दल त्यांना मार्गदर्शन केले. संतुलन आयुर्वेद फर्टिलिटी एक्पिरिअन्स द्वारे गर्भधारणा झालेल्या बहुतांशी स्त्रिया दुसरे बाळ आवर्जून हवे आहे असे सांगतात.तस्यास्तु खलु यो व्याधिरुत्पद्यते स कृच्छसाध्यो भवति असाध्यो वा, गर्भवृद्धिक्षयितशिथिलसर्वधातुत्वात्, प्रव-वेळा, त्याच्या स्तन्यपानाच्याच्या वेळा, त्याची शी-शू या सगळ्यांबरोबर तिला जमवून घ्यायला लागते.त्याच बरोबरीने या काळात गर्भाशयाची शुद्धी सुरू झालेले असते, योनीमार्गे रक्तस्राव होत असतो. प्रसूती होत असताना टाके घेतले गेले असले तर या काळात सॅनिटरी पॅड वगैरे लावताना खूपच त्रास होताना दिसतो. बाळाला स्तन्यपान करविण्याच्या दृष्टीने तिला सतत बसूनही राहावे लागते. तर बघू या या पहिल्या दिवसांत आईची काळजी कशी घ्यायची असते.
प्रसूतीनंतर स्त्रीच्या संपूर्ण अंगाला अभ्यंग संतुलन अभ्यंग सेससी सिद्ध तेलासारखे वातशामक तेल लावावे. विशेषकरून पोट, पाठ व छातीवर तेल नक्की लावावे. प्रसूती रात्री झाली असल्यास पोट व पाठीवर तरी नक्की तेल लावावे. दुसऱ्या दिवशी सकाळपासून संपूर्ण अंगाला तेल लावणे सुरू करावे. हे तेल कोमट केलेले असले तर अधिक चांगले. तेल हलक्या हाताने खालून वर व पोटावर गोलाकार दिशेत लावावे. सिझर झाले असेल तर पोटावर तेल लावणे टाळावे पण इतर जागी तेल लावता येते. प्रसूती झाल्यानंतर स्त्रीला ताकद वाटत असेल तर स्नान करायलाही हरकत नसते. कोमट

तिने थोडा वेळ आराम करणे उत्तम.
त्यानंतर संतुलन शक्ती धुपासारख्या धुपाने योनाभागी धूपन करावे. यावेळी योनीभागाची स्वच्छता राखणे अत्यंत आवश्यक असते. कुठल्याही संक्रमणापासून भांडायला अशा प्रकारचे धूपन करण्याचा फायदा मिळतो.

# यशस्वी होण्यासाठी काय करायला हवे ?



आयुष्यात प्रत्येक व्यक्तीला यशस्वी होण्याची आस असते. पण, यशस्वी होणे म्हणजे नेमके काय? तर, आपल्या मनातून आपण ठरवलेले ध्येय आपण साध्य करणे म्हणजे यशस्वी होणे. पण, असे अनेक लोकांच्या बाबतीत घडत नाही. ध्येय तर हे लोक ठरवतात. पण, ते पूर्ण मात्र करू शकत नाहीत. यामागे बरे कारण काय असेलष्ठ? खरेतर येथेच मेख आहे. आपण यशस्वी का होत नाही यावर विचार करण्यापेक्षा आपण यशस्वी होण्यासाठी काय करायला हवे यावर विचार करायला हवा.
आपल्या जीवनात आलेले अपयश हेच सिद्ध करते की, यशस्वी होण्यासाठी योग्य प्रयत्न आपण केले नाहीत. म्हणूनच यशस्वीतेकडे जीवनाला न्यायचे असेल, तर जगभरातील यशस्वी लोकांचा अभ्यास करा. त्यांच्याकडून प्रेरणा घ्या. यशस्वी होण्यासाठी त्यांनी काय काम केले किंवा काय मार्ग वापरला याचा बारकाईने अभ्यास करा. जीवनात त्यांना काम करा किंवा न करा पण त्यांचा अभ्यास नक्की करा त्यांचे मार्ग अवलंबण्याचे प्रयत्न करा. आपल्या शरीराकडून जो व्यक्ती आयुष्यात नेहमीच योग्य कष्टाची अपेक्ष करतो, योग्य कारणासाठी आपली शक्ती खर्च करतो त्या माणसाला यशापासून कोणतीच शक्ती रोखू शकत नाही. पण जो व्यक्ती तशी अपेक्षा आपल्या शरीराकडून न ठेवता कामचुकारपणा, आळस, कंटाळा, पाट्या टाकण्याचे काम करतो, तो कधीच यशस्वी होऊ शकत नाही.एका रात्रीत कोणताही व्यक्ती यशस्वी होत नाही. कष्ट आणि निष्ठेचे खत त्यासाठी घालावे लागते. हे सर्व करत असताना माणसाचा आत्मविश्वास कामी येतो. आत्मविश्वास ज्याच्या मनात ठासून भरला आहे. कोणतेही काम त्याला अशक्य नसते. या लोकांची कार्यपद्धती लाथ मारीन तेथे पाणी काढील अशी असते. यश अशा लोकांना लवकर भेटते.आपल्या ध्येयाकडे न थांबता न थकता जो व्यक्ती चालत राहतो त्याला आपले ध्येय कधीच दूर नसते. काहीही झाले तर हे लोक आपले ध्येय मिळवतातच मिळवातात.
जीवनात यशस्वी होण्यासाठी कष्टाची तयारी ठेवा. कारणे सांगत बसू नका. तुम्हाला कारणे मागे खेच-तील. पण विचार तुम्हाला ध्येयाप्रती पोहोचण्यास मदत करते. अल्पसंतृष्ट राहू नका- अनेक लोकांना अल्पसंतृष्ट राहण्याची भारी हौस असते. जे लोक मिळाले आहे त्यात धन्यता मानतात. पण, एवढ्याने तुमची स्वप्ने साकार होत नाहीत. त्यासाठी सतत आपली महत्वाकांक्षा वाढती ठेवायला हवी.

# दिवेआगार-हरिहरेश्वर-श्रीवर्धन

रोजच्या धकाधकीच्या जीवनातून जर चार दिवस शांत आणि निसर्गरम्य परिसरात घालवायला मिळाले तर याच्याइतका आनंदाचा क्षण अजून कुठला असेल? आणि हे सर्व जर खिशाला परवडेल अशा दरात जर मिळाले तर दुधात साखरच पडली म्हणायचे. असा हा मजेत सुट्टी घालवण्यास उत्तम परिसर म्हणजे दिवेआगार-श्रीवर्धन-हरिहरेश्वर परिसर.
या परिसरात कसे जायचे?
हा परिसर रायगड जिल्ह्यात मुबंई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील गोरेगावच्या पश्चिमेला येतो. जर तुम्ही पुण्यावरुन निघणार असाल तर रेल्वेची सोय नाही. स्वारगेटवरुन थेट दिवेआगार बस जाते आणि तिचा मार्ग पुणे-पौड-ताम्हिणी- डोंगरवाडी-आदरवाडी-विळे-माणगाव-गोरेगाव-दिवेआगार (सुमारे १५० कि.मी.). दुसरा एक मार्ग भोर मार्गे वरंधा घाटातून गोरेगा-वला जातो आणि तिथून पुढे दिवेआगार. मुबंईहून या प्रदेशात येताना मुबंई-गोवा राष्ट्रीय मार्गाने कोलाड, माणगावच्या पुढे गोरेगाववरुन दिवेआगारला जाता येते.
राहण्याची व जेवणाची व्यवस्था
कुठेही निघताना ही सर्वात महत्वाची गोष्ट असली तरी इथे जाताना त्याची काळजी करण्याचे कारण नाही. कारण तिथली अतिशय प्रेमळ माणसे म्हणजे श्री. सुहास बापट आणि त्यांच्या पत्नि सौ. वर्षाताई बापट, तुम्ही फक्त त्यांचा फोन नबंर ०२१४७-२२४३७७ लक्षात ठेवा आणि केव्हाही फोन करुन तुमचे बुकिंग करा. राहायची व्यवस्था तर ते करतीलच पण चहा, फराळ आणि भोजन यासर्व गोष्टी तुम्हाला इतक्या प्रेमाने आणि अतिथ्यशिल पणे देतील की तुम्हाला घराबाहेर आह-ोत असे भासणारच नाही. त्याच्यांकडील फणसाची भाजी, उकडीचे मोदक यासारखे पदार्थ जर खाल तर अण्णपूर्णा ह्या शब्दाचा खरा अर्थ कळेल. काही स्पेशल गोष्टीं खाण्यासाठी आधी पूर्व कल्पना द्यावी लागते ऐवढेच. हो पण याच्याकडे फक्त शुध्द शाकाहरी जेवणच मिळेल, मासांहरी लोकासाठी दुसरीकडे जेवणाची व्यवस्था आहे. राहण्याची सोय म्हणजे खरोखरीच कोकणातील



घरांचे पुस्तकांत वाचलेले वर्णन. नारळी पोफळीच्या बागेतील कौलारु घर, त्याच्या पुढे आणि मागे मोठे सारवलेले अंगण, तेही अगदी स्वच्छ, भरपूर पाणी आणि स्वच्छ मोकळी हवा. जिथून समुद्र अगदी पाच दहा मिनीटांच्या अतंरावर. समुद्राच्या पाण्याची खळखळ तुम्हाला अगदी घरातुनच ऐकायला येते आणि ह्याची मजा काही वेगळीच आहे.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




सध्या हॉट योग, योगालेट्स, योग एरोबिक्स, कॅन्डलेलिट योग यांसारखे नवनवीन योगप्रकारांचा ट्रेंड अलीकडच्या काळात पाहायला मिळत आहे. पिलेट्ससारखे योगप्रकार हे पाठ आणि पोटाच्या स्नायूंसाठी अतिशय उपयुक्त मानले जातात. नव्या ट्रेंडनुसार कार्यात्मक प्रशिक्षण आणि पिलेट्स यांना एकत्रित करण्यात आलं आहे. ज्यामुळे शरीराचा तोल सांभाळण्यासाठी आवश्यक असलेला समन्वय साधण्यास मदत होते. या व्यायामप्रकारात बोसू बॉल, वोबल बोर्ड्स आणि जिम बॉल्स यांची मदत घेतली जाते.

## २ Joke — विनोद




दोन मित्र खूप दिवसांनी एकत्र भेटले. गोष्टीवरून गोष्टी निघाल्या. ङ्गतुझी बायको स्वभावाला कशी आहे रे?फ पहिल्याने विचारले. ङ्गखूप चांगली आहेफ दुसरा म्हणाला. ङ्गवा!... ऐकून बरं वाटलं! तुझी रे!...फ ङ्गमाझी बायको तर रोज माझी पूजा करते.फ ङ्गकाय म्हणतोस? ङ्गहो. रोज एकदा तरी माझ्यापुढे हात नाचवून ती म्हणते आता दिवे ओवाळू का तुम्हाला?

## ३ Message — संदेश




Madam danda leke class me aayi
Madam – madam me sapne me japan pahuch gyi thi
Madam – Billu tu kaha tha kal ?
Billu – Madam me pinki ko airport pe chorne gaya tha.


## ४ Thought — सुविचार



तेजस्वी नावामुळे गीताला पावित्र्य येते.
– बायरन विज्ञानविश्व

**संस्कृत सुभाषित**
**न विषादे मनः कार्यं विषादो बलवत्तरः।**
**विषादो झन्ति पुरुषं बालं क्रुद्ध इवोरगः।।**
अर्थ : मनात कधी विषाद आणू नये, हा विषाद फार बलवत्तर असतो जणू एखादा विषारी सर्प असावा, तसा हा विषाद असतो व तो बालांचा-पुरुषांचा नाश करतो.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. सुंदर पती-पत्नीचा जोडा
५. हार
८. काळे ज्वालाग्रही खनिज
११. मऊ, मृदू
११अ. दारुचा एक प्रकार
१२. यजमान, पती
१४. रक्षण करणारा
१५. बाजार
१६. पावसाची झड
१७. पापणी न हलवता (पाहणे)
१९. सरपणाचे दुकान
२१. संत रामदासस्वामी यांनी रचलेला ग्रंथ
२४. जोम, मस्ती
२५. अवस्था, दशा
२७. पंख
२८. तुरुंग
२९. काठाच्या नक्षीप्रकारामुळे प्रसिद्ध धोतरप्रकार ---- काठी
३१. वर्ष
३२. अडकित्त्याने कातरण्याचे विड्यात घातले जाणारे फळ
३४. हळद पिऊन का अशी होता येणार?
३५. कागदावर आखलेला कप्पा
३७. आचारी
३९. माफी मागणारा
४२. दिवाणखाना
४३. सत्य
४४. अतिरेक, टोक
४५. मोठे गाव
४७. मातापिता
५१. कुटी
५२. कागदाचे एक परिमाण
५३. ढीग, चळत
५४. शाळेतील शिक्षिका
५५. केस काळे करण्याचे साधन
५७. वेल
५९. समुद्र
६१. विनोबाजींच्या गीतेवरील ओव्या
६३. लढतना मृत्यू येणे
६५. अखंड
६६. दृष्ट
६७. स्त्री
६८. रोखलेली नजर
६९. शेळी
७१. मैत्रीण
७२. ठराविक पैसे
७४. पायंडा, पद्धत
७६. दरोडा
७८. धोकादायक
८०. माणूस
८२. सूर्याचे एक नाव
८४. सटकन, पटकन
८५. मातीचा कण
८६. दुसऱ्यासाठी केलेला खर्च

### उभे शब्द

१. रत्नजडित माळ
२. अंत:करण
३. किंमत
४. नमन
५. मागील अंगणाचा दरवाजा
६. मीठ
७. अरण्य
८. नवाकोरा
९. रेचक
१०. एक पालेभाजी
१३. दरारा, इभ्रत, वजन
१८. सुसर
२०. जनगणना
२२. नरमांजर
२३. पृथ्वी
२५. भूतकाळ
२६. चिंतन
२७. परीक्षा घेणारा
३०. आशीर्वाद देणारी
३१. मित्र
३३. प्रयत्न
३६. बेकरीतील एक गोड पदार्थ
३८. पहाटेची गाढ निद्रा
४०. तुळशीमाळ धारण करणारा
४१. पार्थिवावरचे वस्त्र
४५. यमपुरी
४६. घरातील मोठी माणसे
४८. घाबरणे
४९. एक बारीक धान्य
५०. पायाचे उभे हाड
५४. स्त्रीलंपट
५६. चकचकीत, स्वच्छ
५८. चांदणी
५९. भेग, चीर
६०. किल्लेदार
६२. दिवसाचा चोविसावा भाग
६४. धनुष्यबाण
६५. अफूचे बी
६७. पूर्ण नेस्तनाबूत
६९. भाजपची विद्यार्थी संघटना
७०. ज्ञाती
७३. विचारांचे, भावनांचे इंद्रिय
७५. होडी
७७. वसन, वस्त्र
७९. बशीचा जोडीदार
८१. नवरामुलगा
८३. तीक्ष्ण नजरेचा पक्षी

### आडवे उत्तरे

१.रतिमदन ५.पराभव ८.कोळसा ११.नरम ११अ.रम १२.नवरा १४.रक्षक १५.हाट १६.सर १७.टकमक १९.वखार २१.दासबोध २४.रग २५.गत २७.पर २८.कारा २९.करवत ३१.सन ३२.सुपारी ३४.गोरी ३५.रकाना ३७.खानसामा ३९.क्षमायाचक ४२.दालन ४३.खरी ४४.कळस ४५.नगर ४७.जनकजननी ५१.झोपडी ५२.रीम ५३.चवड ५४.बाई ५५.कलप ५७.लता ५९.सागर ६१.गीताई ६३.धारातीर्थी पडणे ६५.सलग ६६.खल ६७.नारी ६८.टक ६९.अजा ७१.सखी ७२.रकम ७४.रीतभात ७६.डाका ७८.खतरनाक ८०.मानव ८२.रवि ८४.टपकन ८५.रज ८६.पदरमोड

### उभे उत्तरे

१.रत्नहार २.मन ३.दर ४.नमस्कार ५.परसदार ६.रामरस ७.वन ८.कोराकरकरीत ९.सारक १०.चाकवत १३.वट १८.मगर २०.खानेसुमारी २२.बोका २३.धरा २५.गतकाल २६.मनन २७.परीक्षक ३०.वरदायिनी ३१.सखा ३३.प्रयास ३६.नानकटाई ३८.साखरझोप ४०.माळकरी ४१.कफन ४५.नरक ४६.वडीलधारी ४८.कचरणे ४९.जव ५०.नडगी ५४.बाईलवेडा ५६.लखलखीत ५८.तारा ५९.सापट ६०.गडकरी ६२.तास ६४.तीरकमान ६६.खसखस ६७.नायनाट ६९. अभाविप ७०.जात ७३.मन ७५.तर ७७.कापड ७९.कप ८१.वर ८३.घार




## थोडक्यात/ संक्षिप्त

### पहिल्या सामन्यात फ्रान्ससमोर मजायंट किलर्सफमोरोक्कोचं आव्हान

मुंबई–फिफा विश्वचषक २०२६ चा पहिला उपांत्यपूर्व फेरीचा सामना आज रात्री खेळला जाईल. किलियन एम्बाप्पेच्या फ्रान्सचा सामना मजायंट किलर्सफमोरोक्कोशी होईल. हा सामना आज रात्री १:३० वाजता बोस्टन स्टेडियमवर खेळला जाईल. फ्रेंच स्ट्रायकर एम्बाप्पेनं या स्पर्धेत सात गोल केले आहेत. तर मेस्सी आठ गोलांसह गोल्डन बूटच्या शर्यतीत आघाडीवर आहे. जर एम्बाप्पेनं या सामन्यात गोल केला, तर तो मेस्सीला मागे टाकेल. फ्रान्स आणि मोरोक्को यांच्यात दुसरा विश्वचषक सामना : फ्रान्स आणि मोरोक्को यांच्यात आतापर्यंत सहा आंतरराष्ट्रीय सामने खेळले गेले आहेत. या सामन्यांमध्ये फ्रान्सचं वर्चस्व राहिलं आहे. फ्रान्सनं चार सामने जिंकले आहेत, तर मोरोक्कोनं केवळ एक सामना जिंकला आहे आणि एक सामना अनिर्णित राहिला आहे. फिफा विश्वचषकाच्या इतिहासात हे दोन संघ दुसऱ्यांदा एकमेकांसमोर येतील. यापूर्वी, २०२२ च्या विश्वचषक उपांत्य फेरीत फ्रान्सनं मोरोक्कोला २–० नं पराभूत केलं होतं. मोरोक्को या पराभवाचा बदला घेण्याच्या प्रयत्नात असेल. फ्रान्सनं जिंकले सर्व सामने : फ्रेंच संघ या स्पर्धेत आपले सर्व पाचही सामने जिंकून अपराजित राहिला आहे. गट टप्प्यात, फ्रान्सनं नॉर्वेला ४–१, इराकला ३–० आणि सेनेगलला ३–१ नं पराभूत केलं. ३२ संघांच्या फेरीत, संघानं स्वीडनचा सामना केला आणि ३–० नं विजय मिळवला. त्यानंतर, १६ संघांच्या फेरीत, त्यांनी पॅराग्वेला १–० नं पराभूत करुन उपांत्यपूर्व फेरी गाठली.मोरोक्को देखील अपराजित : मोरोक्को या विश्वचषकात अपराजित राहिला आहे. गट टप्प्यात, संघानं हैतीला ४–२ आणि स्कॉटलंडला १–० नं पराभूत केलं.

### ० विकेट्स तरीही 'या' खेळाडूने भारतीय संघात मिळवले स्थान?

मुंबई–भारत विरुद्ध झिम्बाब्वे यांच्यामध्ये तीन टी२० सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. ही मालिका टीम इंडियाची इंग्लंडविरुद्ध मालिकेनंतर होणार आहे, भारताच्या संघाने झालेल्या मालिकेत आणि सुरु असलेल्या मालिकेत अपेक्षेप्रमाणे कामगिरी केली नाही त्यामुळे आता भारताच्या संघावर मोठ्या प्रमाणात टीका केली जात आहे. भारतीय संघाने टी२० विश्वचषक २०२६ मध्ये विजेतेपद नावावर केल्यानंतर टीम इंडियाला एक विजय हाती लागला नाही. झिम्बाब्वेविरुद्ध होणाऱ्या तीन सामन्यांच्या मालिकेसाठी बीसीसीआयने टीम इंडियाची घोषणा केली आहे यामध्ये आता अनेक नव्या खेळाडूंना भारतीय संघामध्ये खेळण्याची संधी मिळणार आहे.आता या संघामध्ये अशा एका गोलंदाजाला स्थान मिळाले आहे त्याने आयपीएलमध्ये एकही विकेट घेतला नाही. भारत विरुद्ध झिम्बाब्वे यांच्यामध्ये होणाऱ्या टी२० मालिकेसाठी टीम इंडिया श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात खेळताना दिसणार आहेत. या संघामध्ये आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करणाऱ्या अश-ोक शर्मा आणि यश ठाकूर यांसारख्या खेळाडूंना भारतीय संघात पहिल्यांदाच स्थान देण्यात आले आहे. तर रिंकू सिंगला देखील भारतीय संघामध्ये कमबॅक करण्याची संधी मिळणार आहे. आता भारतीय संघामध्ये २१ महिन्यानंतर टीम इंडियाचा आणखी एक खेळाडू संघामध्ये कमबॅक करणार आहे. लखनऊ सुपर जायंट्सच्या संघातील वेगवान गोलंदाज मयंक यादव हा आता भारतीय टी२० संघात पुनरागमन करणार आहे. मयंक यादवने आयपीएलमध्ये त्याच्या स्फोटक गोलंदाजीने लक्ष वेधले होते.

### अभिषेक शर्मानं ठोठावला दिल्ली उच्च न्यायालयाचा दरवाजा

दिल्ली–भारतीय क्रिकेट संघाचा स्फोटक सलामीवीर अभिषेक शर्मा जो सध्या इंग्लंडमध्ये पाच सामन्यांच्या टी–२० मालिकेत खेळत आहे, त्यानं आपल्याबद्दल सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या आक्षेपार्ह पोस्ट हटवण्याची मागणी करत दिल्ली उच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली आहे. या प्रकरणात शर्मांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या त्याच्या वकिलांनी, अद्याप न हटवलेल्या लिंकचा तपशील देणारं एक अतिरिक्त प्रतिज्ञापत्र दाखल केलं आहे. न्यायमूर्ती ज्योती सिंह यांनी सांगितलं की, अभिषेक शर्माच्या व्यक्तिमत्व हक्कांचं संरक्षण करण्यासाठी त्या या प्रकरणात अंतरिम आदेश जारी करतील.

न्यायालयानं प्रकरणात समन्स जारी केलं : अभिषेक शर्मांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलांनी सांगितलं की, अद्याप न हटवलेल्या लिंकचा तपशील देणारं एक अतिरिक्त प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आलं आहे. शर्माच्या वकिलांनी सांगितलं की, काही पोस्ट आधीच हटवण्यात आल्या असल्या तरी, फेसबुक आणि इंस्टाग्रामवरील दोन पोस्ट आणि आणखी एक पोस्ट, ज्यात अपमानास्पद भाषा होती, जो हटवणं आवश्यक आहे. मेटाच्या वकिलांनी सांगितले की ते दोन्ही सोशल मीडिया पोस्ट काढून टाकण्यात येतील, तर ॲमझॉन्च्या वकिलाने सांगितले की ते न्यायालयाच्या आदेशाचं पालन करतील आणि परवानगीशिवाय अभिषेक शर्माचा फोटो वापरलेलं यूआरएल काढून टाकतील.

# विश्वचषकात फ्रान्सची ऐतिहासिक कामगिरी

सामन्याचा निकाल: फ्रान्सने मोरोक्कोचा २–० असा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. विक्रम: या विजयासह फ्रान्सने विश्वचषक इतिहासात सलग तिसऱ्यांदा उपांत्य फेरी गाठण्याचा ऐतिहासिक पराक्रम केला आहे.

सामन्याचे ठिकाण: हा उपांत्यपूर्व सामना बोस्टन येथे खेळवला गेला.सामन्यातील महत्त्वाचे क्षण पहिली वेळ: सामन्याच्या पहिल्या भागात एम्बाप्पेला मिळालेल्या पेनल्टीचे गोलमध्ये रूपांतर करता आले नाही.

पहिला गोल (६०वे मिनिट): किलियन एम्बाप्पेने क्षेत्राच्या बाहेरून शानदार खेळ करत फ्रान्सला १–० अशी आघाडी मिळवून दिली.

दुसरा गोल (६६वे मिनिट): उस्मान डेम्बेलेने क्षेत्राबाहेरून अप्रतिम गोल करत फ्रान्सची आघाडी २–० ने भक्कम केली.


चिंतेची बाब: सामन्याच्या अखेरीस एम्बाप्पेला किरकोळ दुखापत झाली, मात्र त्याची गंभीरता अजून स्पष्ट झालेली नाही.

मोरोक्कोचा लढा: पराभवानंतरही मोरोक्कोचा गोलरक्षक यासिन बुनू याने अनेक अप्रतिम बचाव करत कौतुकास्पद कामगिरी केली.

पुढील समीकरणे

उपांत्य फेरी: फ्रान्सचा सामना स्पेन किंवा बेल्जियम यांच्यापैकी एका संघाशी होईल (ज्यांचा उपांत्यपूर्व सामना उद्या होणार आहे).

संभाव्य अंतिम सामना: दुसऱ्या बाजूच्या गटामध्ये इंग्लंड, नॉर्वे, अर्जेंटिना आणि स्वित्झर्लंड हे संघ शर्यतीत असून, यातील एक संघ अंतिम सामन्यात फ्रान्ससमोर येऊ शकतो.



## एक खेळाडू आणि ८ देशांशी नातं, डेव्हिड अलाबाची ग्लोबल कहाणी ऐकून थक्क व्हाल!

दिल्ली–फिफा वर्ल्ड कप २०२६ ला ११ जून पासून सुरुवात झाली होती, जवळपास महिनाभर सुरु असलेल्या या स्पर्धेचा शेवट १९ जुलै रोजी होणार आहे. ग्रुप स्टेज, राउंड ऑफ ३२, राउंड ऑफ १६ नंतर आता या स्पर्धेचा प्रवास हा क्वार्टर फायनलपर्यंत येऊन पोहोचला आहे. एकूण ८ संघ आता क्वार्टर फायनलमध्ये भिडणार असून यातील चार संघ हे सेमी फायनलमध्ये जातील. यंदाच्या स्पर्धेत तब्बल ४८ देशांनी सहभाग घेतला होता. यात प्रत्येक खेळाडू हा आपल्या देशाचं प्रतिनिधीत्व करत होता. मात्र यासगळ्यात एक असा खेळाडू होता जो स्पर्धेत एका संघाचा भाग होता मात्र त्याचे इतर ८ देशांशी खूप जवळचे नाते होते. ऑस्ट्रिया या देशाच्या फुटबॉल संघाचा कर्णधार डेव्हिड अलाबा हा फिफा वर्ल्ड कपमध्ये सहभागी झालेला सर्वात असामान्य खेळाडू ठरला.

डेव्हिड अलाबाचं ८ देशांशी नातं :

डेव्हिड अलाबाचा जन्म हा २४ जून १९९२ रोजी जर्मनीच्या म्युनिक येथे झाला असून त्याच बालपण हे ऑस्ट्रियात गेले. तेथूनच खऱ्या अर्थाने त्याच्या फुटबॉल प्रवासाला सुरुवात झाली. त्यामुळे त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व करायला सुरुवात झाली आणि त्यामुळे ऑस्ट्रिया हा त्याचा राष्ट्रीय संघ ठरला.

डेव्हिड अलाबाची कौटुंबिक पार्श्वभूमी ही तितकीच वैशिष्ट्यपूर्ण आहे. डेव्हिडचे वडील नायजेरियाचे असून ते संगीत क्षेत्राशी संबंधीत आहेत. तर डेव्हिडची आई ही फिलिपिन्सची असून ती तेथे परिचारिका होती. तर डेव्हिड अलाबाच्या कुटुंबाची मूळ ही आफ्रिकेच्या काँगो देशाशी जोडलेली आहेत. त्यामुळे डेव्हिड अलाबाचा यूरोप, आफ्रिका आणि आशिया अशा तीनही खंडांचा वारसा लाभलेला आहे.

डेव्हिडला त्याच्या वैयक्तिक आयुष्यात सुद्धा जागतिक प्रवास लाभला असून त्याची पत्नी डेन्मार्क म्हणून कुटुंबासह तो सध्या स्पेनमध्ये वास्तव्यास आहे. डेव्हिडने क्लब फुटबॉलमध्ये जर्मनीतील बायर्न म्युनिक आणि स्पेनच्या रिअल माद्रिदसारख्या फुटबॉल क्लबचे प्रतिनिधित्व केले. त्याने यात अनेक विजेतेपदं जिंकली. बुंडेसलिगा, ला लिगा आणि यूएफा चॅम्पियन्स लीगसारख्या स्पर्धांमध्ये त्याने जबरदस्त कामगिरी केली.

## कोण आहे अर्णव पापरकर? विंबल्डनमध्ये भारतीय टेनिसचा नवा हिरो! ३६ वर्षांनी रचला इतिहास



दिल्ली–लंडनमधील ऑल इंग्लंड लॉन टेनिस क्लबमध्ये सुरु असलेल्या विम्बल्डन २०२६ ची जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. या विम्बल्डन २०२६ मधील बॉईज सिंगल्समध्ये भारताच्या लेकाने इतिहास रचला आहे. भारताचा युवा खेळाडू अर्णव पप्पारकर याने वयाच्या १८ व्या वर्षी जपानच्या रयो ताबाताला अवघ्या मिनिटामध्ये पराभूत करुन ६–२, ६–१ असे पराभूत करुन उपांत्यपूर्व फेरीमध्ये प्रवेश केला आहे. ने या स्पर्धेतील भारताचा ३६ वर्षांचा दुष्काळही संपवला. ३६ वर्षांनंतर एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करणारा अर्णव हा भारताचा पहिला खेळाडू ठरला आहे. आता हा अर्णव पप्पारकर कोण आहे यासंदर्भात सविस्तर वाचा. अर्णव पप्पारकर याने केलेल्या कामगिरीनंतर त्याला भारतीय टेनिसच्या दिग्गजांच्या पंक्तीत स्थान मिळाले आहे. अर्णवच्या राउंड ऑफ ३२ च्या कामगिरीबद्दल सांगायचे झाले तर त्याने सुरु असलेल्या दुसऱ्या फेरीत त्याने अमेरिकेच्या ज्युनियर जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या कीटन हॅन्सला एकतर्फी पराभूत केले. उपांत्यपूर्व फेरीच्या आधीच्या सामन्यात त्याने जपानच्या रयो ताबाताला एकतर्फी सामन्यात ६–२, ६–१ ने हरवून क्वार्टर फायनल सामन्यामध्ये स्थान पक्के केले आहे. आयटीएफ ज्युनियर जागतिक क्रमवारीत १९व्या क्रमांकावर असलेल्या अर्नाबच्या कारकिर्दीतील ही आतापर्यंतची सर्वात मोठी कामगिरी मानली जात आहे.

अर्णवच्या आधी, हा पराक्रम महान लिएंडर पेसने केला होता. त्याने १९९० मध्ये या स्पर्धेत विजे-तेपद पटकावून इतिहास रचला होता. आता, तीन दशकांनंतर, अर्णवला लिएंडर पेसच्या पराक्रमाची पुनरावृत्ती करण्याची संधी मिळाली आहे. आता त्याचा क्वार्टर फायनलचा सामना हा संध्याकाळी पाच वाजता होणार आहे. या सामन्याचे थेट प्रक्षेपण स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर पाहता येणार आहे या सामन्याची लाईव्ह स्ट्रिमिंग ही जिओहॉटस्टार पाहायला मिळणार आहे. अर्णव आता उपांत्यपूर्व फेरीत अमेरिकन क्वालिफायर जॉर्डन लीचा सामना करेल.

कोण आहे अर्णव पप्पारकर?

अर्णव पप्पारकर वैयक्तिक जीवनाबद्दल सांगायचे झाले तर तो भारतीय टेनिसपटू पुण्याचा आहे. अर्णव दोन ठिकाणी सराव करतो. भारतात, तो हेमंत बेंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली खेळातील बारकावे शिकत आहे. त्याचे दुसरे प्रशिक्षण केंद्र स्पेनमधील सोटो अकादमी आहे. पापरकर हे नाव अजून प्रसिद्ध किंवा मोठे नसेल, पण विम्बल्डन ज्युनियर स्पर्धेत ज्या प्रकारे त्याने आपले कौशल्य सिद्ध केले आहे, त्यावरून त्याचे भविष्य उज्ज्वल असल्याचे स्पष्ट पाहायला मिळत आहेत. यूएस ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीही पोहोचला होता आणि पापरकरच्या आधी, ज्युनियर ग्रँड स्लॅमच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचणारा तो शेवटचा भारतीय खेळाडू होता.

## अंध महिला राष्ट्रीय क्रिकेट संघाची कामगिरी अभिमानास्पद – राज्यपाल

मुंबई–दृष्टिहीन महिला राष्ट्रीय क्रिकेट संघाची वाटचाल दाखवणाऱ्या 'देख ले! इंडिया' या माहितीपटाचे युनिसेफतर्फे लोकभवन येथे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शन करण्यात आले. भारताच्या अंध महिला राष्ट्रीय क्रिकेट संघाच्या विविध सदस्यांसह हा माहितीपट पाहून त्यांनी संपूर्ण संघाला आणि खेळाडूंना कौतुकाची थाप दिली.

दृष्टिहीन खेळाडूंना सहानुभूती नको तर संधी हवी असते असे सांगून अंधाच्या महिला क्रिकेट संघाची वाटचाल तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील विजय दाखवणारा माहितीपट प्रेरणादायी आहे. या माहितीपटाचा आणखी एक प्रयोग लोकभवन येथे आयोजित करून विविध क्षेत्रातील मान्यवरांना तो पाहण्यास निमंत्रित करण्यात येईल, असे राज्यपालांनी सांगितले. माहितीपट निर्माते मुकुंद मूर्ती यांनी सांगितले की, या माहितीपटातून अंध महिला क्रिकेटपटू विशेष आ-वाज करणाऱ्या चेंडूच्या साहाय्याने क्रिकेट कसे खेळतात, याची माहिती समाजाला मिळते. या संघातील खे-ळाडू अतिशय प्रतिकूल सामाजिक व आर्थिक परिस्थितीतून पुढे आल्या असून, त्यांच्या उल्लेखनीय प्रव-ासाचे दस्तऐवजीकरण या चित्रपटात करण्यात आले आहे. हा चित्रपट केवळ क्रिकेटविषयी नाही, तर धैर्य, मैत्री आणि आत्मविश्वासाविषयी आहे. या तरुणींनी सामाजिक, आर्थिक किंवा शारीरिक अशा कोणत्याही अडथळ्यावर दृढनिश्चयाच्या बळावर मात करता येते, हे सिद्ध करून दाखवले आहे.भारतीय अंध महिला राष्ट्रीय क्रिकेट संघाच्या उपकर्णधार गंगा कदम यांनी आपल्या अनुभवांना उजाळा दिला. त्या म्हणाल्या ''क्रिकेटमुळे माझे आयुष्य बदलले. या खेळामुळे मला आत्मविश्वास, आयुष्याला दिशा आणि देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. इतरांप्रमाणे मला वाचता येत नसल्याम ळे मला पूर्वी खूप वाईट वाटायचे. मात्र आज मी क्रिकेट खेळत असल्याचा अभिमान वाटतो. हा चित्रपट आम च्या संघाचा प्रवास आहे, पण तो प्रत्येक त्या मुलीचीही कहाणी आहे जी विविध अडचणींवर मात करून आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी झटत असते.यावेळी संघातील खेळाडू प्रिया खीर आणि सुषमा पटेल उपस्थित होत्या. क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडियाचे अध्यक्ष तसेच समर्थनम ट्रस्ट फॉर द डिसेबल्डचे संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. महांतेश जी. किवडसन्नावर यांनी दृष्टिहीन असलेल्या व्यक्तींसाठी क्रिकेटने उभ्या केलेल्या नव्या संधींचा आढावा घेतला.

### सैफ अली खानने ठोकलं अर्धशतक

नवी दिल्ली–अधिकतर बॉलिवूड स्टार हे क्रिकेट त्यांची आवड म्हणून खेळतात, मात्र अभिनेता सैफ अली खानच्या बाबतीत तसं नाहीये. क्रिकेट ही सैफ अली खानच्या कुटुंबाची ओळख आहे. सैफ अली खानने काही दिवसांपूर्वी इंग्लंडमध्ये भर उन्हात क्रिकेट

## लॉर्ड्सवर रंगणार भारत–इंग्लंड महिला कसोटी; हेड–टू–हेडपासून लाईव्ह स्ट्रीमिंगपर्यंत सर्व माहिती एका क्लिकवर

दिल्ली–भारतीय महिला संघ विश्वचषकातून लीग टप्प्यातून बाहेर झाल्या होत्या, त्यानंतर आता टीम इंडिया आता महिला टी२० विश्वचषक २०२६ च्या उपविजेत्या संघाशी भिडणार आहेत. भारत विरुद्ध इंग्लंड महिला संघ यांच्यामध्ये कसोटी सामना खेळवला जाणार आहे. पुरुष संघाचा चौथा टी२० सामना झाल्यानंतर लॉर्ड्स मैदानावर महिला कसोटी संघ इंग्लंडविरुद्ध ऐतिहासिक सामना खेळणार आहे. भारतीय महिला संघ विरुद्ध इंग्लंड महिला संघ यांच्यामध्ये कसोटी सामना होणार आहे. यासाठी भारतीय संघाची मागील काही दिवसांपासून सराव करत आहेत. आता भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यामध्ये होणाऱ्या कसोटी सामन्याच्या संदर्भात सर्व अपडेट या लेखामध्ये तुम्हाला देणार आहोत.

भारत विरुद्ध इंग्लंड महिला कसोटी सामना कधी आणि कुठे होणार?

भारत महिला विरुद्ध इंग्लंड महिला यांच्यामध्ये





१० जुलै रोजी सामना खेळवला जाणार आहे. हा सामना लंडनमधील लॉर्ड्स क्रिकेट ग्राउंडवर खेळवला जाणार आहे. या सामन्याचे थेट प्रक्षेपण हे भारतीय क्रिकेट चाहत्यांना सोनी स्पोर्ट्स टेन १, सोनी स्पोर्ट्स टेन ३ आणि सोनी स्पोर्ट्स टेन ४ वर पाहायला मिळणार आहे. तर या सामन्याची लाईव्ह स्ट्रिमिंग सोनीलिव्ह ॲप आणि वेबसाइटवर पाहता येणार आहे. डीडी फ्री डिश वापरकर्त्यांसाठी डीडी स्पोर्ट्सवरही सामन्याचे प्रक्षेपण केले जाईल. भारतीय वेळेनुसार या सामन्याला सुरुवात दुपारी ३.३० वाजता सुरु होणार आहे. तर या सामन्याचे नाणेफेक ३.०० वाजता होणार आहे.

वाचा हेड टू हेड आकडेवारी

भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यामध्ये १५ कसोटी सामने खेळवण्यात आले आहेत, यामध्ये भारताच्या संघाने तीन सामने जिंकले आहेत तर १ सामना इंग्लंडने जिंकला आहे या आकडेवारीमध्ये ११ सामने बरोबरीत संपले आहेत. इंग्लंडचा कसोटी संघ–नॅट सायव्हर-ब्रंट (कर्णधार), टॅमी ब्युमॉन्ट, लॉरेन बेल, माया बुशियर, ॲलिस कॅप्सी, टिली कॉर्टीन-कोलमॅन, सोफी एक्लेस्टोन, लॉरेन फायलर, एमी जोन्स, हेदर नाइट, एमा लँब, ग्रेस पॉट्स, एली थ्रेलकेल्ड, मॅडी व्हिलियर्स, इसी वाँग भारताचा कसोटी संघ –भारत: हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना, यास्तिका भाटिया, हरलीन देओल, क्रांती गौड, रिचा घोष, प्रिया पुनिया, स्नेह राणा, रेणुका सिंग, जेमिमाह रॉड्रिग्स, सायली सातघरे, शेफाली वर्मा, नंदनी शर्मा, दीप्ती शर्मा, श्री चरणी.

# पहिल्या चेंडूवर षटकार मारणारा वैभव सूर्यवंशी सतत फ्लॉप का होतोय?

## पार्थिव पटेलने सांगितले कारण, म्हणाला, प्रत्येक गोलंदाज




दिल्ली–भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये सुरु असलेल्या टी–२० मालिकेत भारतीय संघाकडून सुपरफ्लॉप शो पाहायला मिळाला आहे. या मालिकेतील पहिला सामना पावसाम ळे धुतला गेला होता. पण त्यानंतर झालेल्या पुढील दोन्ही सामन्यांमध्ये भारतीय संघाला दारुण पराभवाचा सामना करावा लागला आहे. या दोन्ही सामन्यांमध्ये वैभव सूर्यवंशीला प्लेईंग ११ मध्ये स्थान दिलं गेलं होतं. पण तो दोन्ही सामन्यांमध्ये स्वस्तात माघारी परतला. मालिकेत पिछाडीवर असलेल्या भारतीय संघाला जर मालिकेत पुनरागमन करायचं असेल, तर चौथा सामना कुठल्याही परिस्थितीत जिंकावा लागणार आहे. दरम्यान या साम न्याआधी भारताचा माजी क्रिकेटपटू पार्थिव पटेलने वैभव सूर्यवंशीला मोलाचा सल्ला दिला आहे.

वैभव सूर्यवंशीने आयपीएल २०२६ स्पर्धेत दमदार कामगिरी केली होती. या कामगिरीच्या बळावर त्याची भारतीय संघात निवड करण्यात आली होती. आयर्लंड दौऱ्यावर त्याला एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नव्हती. इंग्लंड दौऱ्याबरील दुसऱ्या टी–२० सामन्यात त्याने पदार्पण केलं. यादरम्यान त्याने जोफ्रा आर्चरच्या पहिल्याच चेंडूवर खणखणीत षटकार खेचला. त्यानंतर तो स्वस्तात बाद झाला. दुसऱ्या सामन्यातही त्याने जोफ्रा आर्चरच्या गोलंदाजीवर हल्ला चढवला. पण जोफ्रा आर्चरने त्याला शॉर्ट चेंडूवर बाद करत माघारी धाडलं.

पार्थिव पटेलचा वैभव सूर्यवंशीला मोलाचा सल्ला

वैभव सूर्यवंशीबाबत बोल-ताना पार्थिव पटेल म्हणाला की, ''फक्त जोफ्रा आर्चरच नाही, तर आयपीएल पाहणाऱ्या कोणालाच हे पाहून आश्चर्य वाटणार नाही की, वैभवविरुद्ध गोलंदाजी करताना जाणूनबुजून शॉर्ट गोलंदाजी रणन-ीतीचा वापर केला गेला आहे. हा विकेट मिळवून देणारा चेंडू नव्हता. त्याआधी टाकलेला चेंडू देखील शॉर्ट होता. पहिल्या सामन्यात वैभवने ज्या चेंडूवर षटकार खेचला होता, त्या चेंडूला हवा तितका बाऊन्स मिळाला नव्हता. पण लाईन तीच होती.''

तसेच तो पुढे म्हणाला की, ''जसजशी वैभव सूर्यवंशीची कारकिर्द पुढे जाणार, तसं त्याला १४५ किमीतास पेक्षा जास्त वेगवान आणि शॉर्ट पिच गोलंदाजीचा सामना करावा लागेल. त्यामुळे, हे पाहणं महत्वाचं ठरेल की,तो अशा शॉर्ट गोलंदाजीचा सामना कसा करतो. कारण प्रत्येक गोलंदाज त्याच्याविरुद्ध याच रणनीतीचा वापर करेल.'' वैभवने आयपीएल स्पर्धेत शॉर्ट चेंडू मैदानाबाहेर पोहोचवले होते. पण परदेशात खेळताना मुख्यत: इंग्लंडम ध्ये खेळताना चेंडू जास्त बाऊन्स मि ळतो. यासह चेंडू वेगाने येतो आणि स्विंग देखील होतो. असं असतानाही वैभव कसा सामना करेल, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

# राज्य शासनाची कर्जमुक्ती : शाश्वत कृषी विकासाचे धोरण

**विशेष लेख**




शेती ही महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून राज्यातील लाखो कुटुंबांच्या उपजीविकेचा मुख्य आधार आहे. मात्र, हवामानातील अनिश्चितता, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, वाढता उत्पादन खर्च, बाजारपेठेतील चढ-उतार आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतात. अशा परिस्थितीत केवळ तात्पुरता दिलासा देणे पुरेसे नसून शेतकरी पुन्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल, उत्पादनक्षम बनेल आणि भविष्यात कर्जाच्या दुष्टचक्रात अडकणार नाही, अशी दीर्घकालीन व्यवस्था उभी करणे आवश्यक ठरते.

याच व्यापक दृष्टिकोनातून राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देणारी आणि सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांची ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नसून शाश्वत कृषी विकासाच्या व्यापक धोरणाचा महत्त्वाचा भाग म्हणून पाहिली जात आहे.

कर्जमुक्तीचा मूलभूत उद्देश शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणे हा असला, तरी त्यामागील व्यापक विचार अधिक महत्त्वाचा आहे. कर्जमुक्त झालेला शेतकरी पुन्हा पतपुरवठ्यास पात्र होतो. नव्याने पीककर्ज उपलब्ध झाल्यामुळे तो वेळेवर बियाणे, खते, औषधे आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर करू शकतो. यामुळे उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होते आणि शेती अधिक सक्षम बनते.

या योजनेतील सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे विविध प्रकारच्या शेतकऱ्यांचा विचार करण्यात आला आहे. दोन लाख रुपयांपर्यंतची थकीत कर्जे असलेल्या पात्र शेतकऱ्यांना थेट कर्जमुक्ती दिली जात आहे. त्याचबरोबर दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता (One Time Settlement - OTS) योजना उपलब्ध करून देण्यात आली आहे. अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर अशा शेतकऱ्यांनाही कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे मोठ्या कर्जबाजारी शेतकऱ्यांनाही आर्थिक पुनरुज्जीवनाची संधी उपलब्ध झाली आहे.

शासनाने नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचाही विशेष विचार केला आहे. त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे आर्थिक शिस्त, वेळेवर कर्जफेड आणि बँकिंग व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होईल. ही बाब शाश्वत वित्तीय व्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

योजनेची संपूर्ण अंमलबजावणी डिजिटल माध्यमातून केली जात आहे. महाआयटीच्या प्रणालीद्वारे आधार प्रमाणीकरण, ऑनलाइन पडताळणी, बँकांची संगणकीय माहिती आणि थेट लाभ वितरणामुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक, वेगवान आणि विश्वासार्ह झाली आहे. लाभार्थ्यांच्या याद्या ग्रामपंचायत, बँका, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. मोबाईल संदेशाद्वारे लाभार्थ्यांना माहिती देण्याची तसेच तक्रार निवारणाची स्वतंत्र यंत्रणाही उभारण्यात आली आहे. यामुळे प्रशासनातील पारदर्शकता आणि लोकांचा विश्वास अधिक बळकट होईल.

शाश्वत कृषी विकासाचा विचार केवळ कर्जमुक्तीपर्यंत मर्यादित राहत नाही. राज्य शासनाचे उद्दिष्ट शेतकऱ्यांना बारमाही सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून देणे, शेतीमालावर आधारित उद्योग-व्यवसायांना चालना देणे, कृषी प्रक्रिया उद्योगांचा विस्तार करणे, शेतीमालाला योग्य बाजारभाव मिळवून देणे, तातडीच्या पणन व्यवस्था विकसित करणे, वेळेवर पतपुरवठा सुनिश्चित करणे आणि ग्रामीण भागात आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे हे आहे. या सर्व बाबी परस्परपूरक असून त्यांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास आणि शेती अधिक लाभदायक होण्यास मदत होईल.

सिंचनाचा विस्तार झाल्यास पावसावरील अवलंबित्व कमी होईल. आधुनिक तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन, जलसंधारण आणि पीक नियोजन यामुळे उत्पादनात वाढ होईल. प्रक्रिया उद्योग उभारल्यास शेतीमालाला मूल्यवर्धन मिळेल आणि ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीला चालना मिळेल. सक्षम पणन व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळण्यास मदत होईल. या सर्व घटकांची सांगड कर्जमुक्तीशी घालण्यात आल्याने ही योजना शाश्वत कृषी विकासाच्या व्यापक आराखड्याचा भाग ठरते.

आजच्या काळात हवामान बदल हे शेतीसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम, तांत्रिकदृष्ट्या आधुनिक आणि बाजारपेठेशी जोडलेला शेतकरी निर्माण करणे ही काळाची गरज आहे. कर्जमुक्तीमुळे निर्माण होणारे आर्थिक स्थैर्य, वेळेवर मिळणारा पतपुरवठा, आधुनिक शेती पद्धतींचा स्वीकार आणि मजबूत कृषी पायाभूत सुविधा या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे अधिक शाश्वत, सक्षम आणि स्पर्धात्मक कृषी व्यवस्था होय.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' ही त्यामुळे केवळ कर्जमाफीची योजना नाही. ती शेतकऱ्याला नव्याने उभारी देणारी, आर्थिक विश्वास पुनर्स्थापित करणारी, डिजिटल सुशासनाला चालना देणारी आणि कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन शाश्वत विकासाला दिशा देणारी महत्त्वपूर्ण योजना आहे. आर्थिक दिलासा, पतपुरवठा, सिंचन, आधुनिक तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग, बाजारपेठ आणि पायाभूत सुविधांचा समन्वय साधून शेतकऱ्यांचे जीवन अधिक सुखी, समृद्ध आणि आत्मनिर्भर करण्याच्या राज्य शासनाच्या व्यापक धोरणातील हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**

## लातूर शहरातील अनधिकृत वसतिगृहांवर कारवाईची मागणी; अग्निसुरक्षा प्रमाणपत्र नसल्यास व्यवसाय तात्काळ बंद करा



**लातूर/प्रतिनिधी:** लातूर शहरातील अनेक वसतिगृहांमध्ये अग्निसुरक्षेच्या नियमांचे पालन होत नसल्याचा आरोप करत, अग्निशामक विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र (NOC) व अग्निसुरक्षा प्रमाणपत्र नसलेल्या वसतिगृहांवर तात्काळ कारवाई करून त्यांचा व्यवसाय बंद करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते पंकज रावसाहेब देशमुख यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे केली आहे.

याबाबत त्यांनी दिलेल्या तक्रार अर्जात म्हटले आहे की,लातूर शहरातील लातूर शहरातील सर्व वसतिगृहे ज्या कारणासाठी इमारती बांधण्यात आल्या आहेत त्या वापराऐवजी व्यावसायिक पद्धतीने चालविली जात आहेत. विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींना डावलून निवासी इमारतींचा वापर वसतिगृह, मेस व अन्य व्यावसायिक कारणांसाठी केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

वसतिगृहांना बांधकाम परवानगी कोणत्या वापरासाठी देण्यात आली आहे, त्या इमारती निवासी आहेत की व्यावसायिक, त्यांच्याकडे व्यवसाय परवाना आहे का, अग्निशामक विभागाची आवश्यक प्रमाणपत्रे आहेत का, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रारीत पुढे म्हटले आहे की, काही वसतिगृहांमधून मेसचे ड्रेनेजचे सांडपाणी व घाण नाल्यांमध्ये सोडले जात असून परिसरात दुर्गंधी पसरत आहे. तसेच पार्किंगची सुविधा नसताना पार्किंगच्या जागेवर अभ्यासिका, मेस व इतर वापर सुरू असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

रहिवासी भागातील वसतिगृहांमुळे स्थानिक नागरिकांचे जीवन त्रस्त झाले असून, रात्रंदिवस विद्यार्थ्यांचा गोंधळ, वाहनांचे कर्कश हॉर्न आणि अन्य त्रासामुळे ज्येष्ठ नागरिकांसह नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दुर्घटना घडल्यानंतर कारवाई करण्याऐवजी अगोदरच खबरदारी घ्या वसतिगृह मालकांकडून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत पंकज देशमुख यांनी सांगितले की, एखादी दुर्घटना घडल्यानंतर प्रशासन जागे होण्यापेक्षा आधीच तपासणी करून नियमबाह्य वसतिगृहांवर कारवाई करणे गरजेचे आहे. लखनौ येथील वसतिगृहातील आगीच्या घटनेचा संदर्भ देत त्यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर असल्याचे म्हटले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून तक्रारी करूनही महानगरपालिकेकडून अपेक्षित कारवाई झालेली नाही, असा आरोपही त्यांनी केला आहे. चारही क्षेत्रीय कार्यालयांनी मागील काळात कोणती कारवाई केली याचे स्पष्टीकरण देण्याची मागणी त्यांनी केली.

महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, क्षेत्रीय अधिकारी व संबंधित अभियंत्यांनी आठ दिवसांच्या आत या प्रकरणाची चौकशी करून अनधिकृत वसतिगृहांवर कारवाई करून सर्व वस्तीग्रह बंद करण्यात यावे अन्यथा मुख्यमंत्री व नगरविकास मंत्र्यांकडे संबंधित अधिकाऱ्यांविरोधात निलंबनाची नव्हे तर सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी केली आहे कारण हा विषय विद्यार्थ्यांच्या जीवनाशी निगडित आहे, असा इशारा पंकज देशमुख यांनी दिला आहे.

## विद्यार्थ्यांनी जीवनात नीती मूल्य, संस्कारास प्राधान्य द्यावे : जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड

**लातूर/प्रतिनिधी:**

लातूर : जीवनात सर्वांगीण प्रगतीच्या उद्दिष्ट्यपूर्तीसाठी विद्यार्थ्यांनी नीती मूल्ये, संस्कारास प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले.

लातूर येथील अभिनव मानव विकास संस्था द्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयात आयोजित दहावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. भारत बास्टेवाड बोलत होते. याप्रसंगी संस्था अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, कोषाध्यक्ष जयेश बजाज, सहसचिव सुभाष कासले, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी अनेक क्षेत्र खुली असल्याचे सांगितले.विद्यार्थ्यांनी केवळ अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय क्षेत्राकडे वळण्याऐवजी क्रीडा, कलेच्या क्षेत्राकडे वळण्याचा विचार करावा. यशासाठी कठोर परिश्रम, सातत्याची नितांत आवश्यकता असते. त्यामुळे प्रसंगी अपयशाने खचून न जाता सकारात्मक विचार करून प्रगतीपथाकडे वाटचाल करावी असे सांगून डॉ. बास्टेवाड यांनी विद्यार्थ्यांना आपल्या मराठी भाषेचा अभिमान बाळगा, ज्या शाळेत शिकलो तेथून नेमके काय घेतले याचा नेहमीच विचार करत रहा असेही मार्गदर्शन केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा यांनी यावेळी बोलताना संस्थेच्या प्रगतीचा आलेख संक्षिप्त स्वरूपात मांडला. विद्यालयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच बौद्धिक विकासावरही भर दिला गेल्याने सक्षम, निपुण विद्यार्थी तयार होत आहेत. पाठ्यपुस्तकातील ज्ञानाबरोबरच विद्यार्थी बहुश्रुत होत असल्याचे त्यांनी सांगितले.

शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांनी आपल्या मनोगतात यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन महाविद्यालयीन शिक्षणाचा ताण घेऊ नका. ताण घालविण्यासाठी छंद जोपासा असा मौलिक सल्ला दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या उपक्रमाच्या आयोजनामागची पार्श्वभूमी विशद केली. शालेय जीवनात केवळ गुण संपादन करणे महत्वाचे नाही, तर खेळ, वाचन,चित्र, संगीताचाही अनुभव घेतला पाहिजे यासाठीही विद्यालय सतत प्रयत्नशील असते,असेही ते म्हणाले.

यावेळी दहावी परीक्षेतील गुणवंत, शिष्यवृत्ती परीक्षेतील यशस्वी शंभर विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच सायन्स ऑलिंपियाड तर्फे दिल्या गेलेल्या उत्तम प्राचार्य पुरस्काराबद्दल मुख्याध्यापक रमाकांत स्वामी तसेच आंतरराष्ट्रीय कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये यशस्वी सहभाग घेतलेले संस्थेचे सदस्य संजीव भार्गव यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तनुजा देशपांडे यांनी तर संस्थेचे सचिव कमलकिशोर अग्रवाल यांनी आभार प्रदर्शन केले .

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन, गुणवंतांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयात वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. बदलत्या स्पर्धात्मक युगात करिअरच्या विविध संधी, रोजगाराच्या नव्या दिशा आणि आवश्यक कौशल्यांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमास विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष संजयजी बोरा होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. उज्वल भट्टड (संचालक, V-Smart academy, पुणे), सी.एम.ए. अभिजीत सेनगुप्ता आणि सी.ए. अमोल जैन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बँकिंग, वित्तीय सेवा, अकाउंटिंग, सी.ए., सी.एम.ए., स्पर्धा परीक्षा, उद्योग क्षेत्र तसेच आधुनिक तंत्रज्ञानाशी निगडित करिअरच्या विविध संधींची माहिती देत त्यांनी विद्यार्थ्यांना योग्य नियोजन, कौशल्यविकास आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी सी.ए. फाउंडेशन तसेच बारावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारानंतर गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचा प्रवास आणि अनुभव उपस्थितांशी शेअर केले. चर्चासत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून करिअरविषयक शंकांचे निरसन करून घेतले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासकीय अधिकारी प्रा. ऋतुजा देशमुख यांनी कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, सातत्य आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर यश संपादन करावे, असा संदेश दिला. अध्यक्षीय समारोपात संजयजी बोरा यांनी विद्यार्थ्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्नांची कास सोडू नये, चिकाटी आणि सातत्य यामुळे यश निश्चित मिळते, असे सांगितले. करिअर घडविताना कौशल्यविकास आणि सकारात्मक दृष्टिकोन यांना प्राधान्य देण्याचे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आमिर शेख व प्रा. राखी जकोटिया यांनी केले, तर आभार प्रदर्शन महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. सुभाष मोरे यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## कु. समृध्दी अशोकराव पाटील निलंगेकर यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**शिरूर अनंतपाळ/प्रतिनिधी:** महाराष्ट्र काँग्रेस कमिटी युवक प्रदेश सचिव कु. समृध्दी अशोकराव पाटील निलंगेकर यांचा वाढदिवस शिरुर अनंतपाळ नगरपंचायतचे नगरसेवक. सुधीर लखनगावे यांच्या संकल्पनेतून शहरातील सर्वच चारही जि.प.शाळेसह जि.प. प्र.शाळा.आनंदवाडी येथील विद्यार्थ्यांना वही, पेन, ग्रामीण रूग्णालय येथे फळ वाटप, सार्वजनिक लिंगायत स्मशानभुमी येथे वृक्षारोपण यांसह शैक्षणिक साहित्य व विविध समाजपयोगी उपकृमाने उत्साहात साजरा करण्यात आला.कु. समृध्दी अशोकराव शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसानिमीत्त युवा काँग्रेस नेते तथा नगरसेवक. सुधीर लखनगावे यांनी कु. समृध्दी यांच्या वाढदिवसानिमित्ताने शहरातील जि.प.शाळा भोजराजनगर, जि.प.शाळा समतानगर,जि.प.केंद्रिय शाळा शिरुर अनंतपाळ,जि.प.कन्या शाळा शिरुर अनंतपाळ, जि.प.प्रा. शाळा.आनंदवाडी येथील सर्वच विद्यार्थ्यांना वही, पेन यांचे वाटप केले. तसेच ग्रामीण रूग्णालय, शिरुर अनंतपाळ येथे रुग्णांना फळवाटप करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक सचिव. महादेव आवाळे, नगरसेवक. सुधीर लखनगावे, काँग्रेस शहराअध्यक्ष. अशोक कोरे, राष्ट्रवादी शरद पवार गट शहराअध्यक्ष. व्यंकट हंद्राळे, विलासराव हासबे,संदीप धुमाळे, विश्वनाथ हंद्राळे, काशिनाथ धुमाळे, शिवसांब पारशेट्टे, सुर्यकांत गलबले,व्यंकटराव कल्ले, बाबुराव तोरणे, शिवदास उंबरगे,आसिफ उजेडे,व्यंकटराव दाहिगुंडे,मधुकरराव धुमाळे,दिनकर बानाटे,संजय व्यंजने यांच्यासह ग्रामीण रुग्णालयाचे वेद्यकीय अधिक्षक. डाँ. अनंत पुरी, मुख्याध्यापक. सोमनाथ घटकार, बस्वराज कोरे, श्रीमती. शिवाबाई भोजणे,मारोती शिवणे यांसह शाळेतील शिक्षक,शा.व्य. समितीचे पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे नेते,पदाधिकारी,युवक काँग्रेसचे कार्येकर्ते मोठ्या संस्खेने उपस्थित होते.

## शिक्षक आंदोलकांच्या मागण्यांबाबत शासनाने तातडीने चर्चा करावी; आ.अमित देशमुख यांची मागणी

**लातूर/प्रतिनिधी:** मुंबईतील आझाद मैदानावर आपल्या विविध न्याय्य मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या राज्यातील शिक्षकांच्या प्रश्नाकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन(औचित्याचा मुद्दा) द्वारे विधानसभा सभागृहात निवेदन सादर केले.

शिक्षकांचे मुंबईत तीव्र आंदोलन महाराष्ट्र विधानसभा सभागृहात ९ जूलै रोजी बोलताना माजी मंत्री, आमदार अमित देशमुख म्हणाले की, महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेचे श्री. लायक पटेल, श्री. केशवराव जाधव, श्री. राजेश सुर्वे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील असंख्य शिक्षक मुंबईतील आझाद मैदानावर पावसात आंदोलन करत आहेत. शिक्षकांच्या या आंदोलनाकडे शासनाने दुर्लक्ष करून चालणार नाही.

**प्रमुख मागण्यांकडे शासनाचे लक्ष**

शिक्षकांच्या मागण्यांबाबत माहिती देताना माजी मंत्री, आमदार देशमुख यांनी सांगितले की, मुख्यत्वेटीईटीची अट शिथिल करावी, शिक्षकांना अशैक्षणिक कामातून वगळावे आणि शाळांचे थकलेले अनुदान त्वरित मिळावे, यासह अन्य प्रलंबित मागण्यांसाठी हे शिक्षक लढा देत आहेत.

शिक्षकांचे हे प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे. यासंदर्भात शासनाने आपला अधिकृत प्रतिनिधी आंदोलक संघटनेच्या शिष्टमंडळाला भेटण्यासाठी पाठवावा किंवा आंदोलक शिष्टमंडळाला संबंधित मंत्री महोदयांची भेट घेऊन चर्चा करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी, असे निवेदन यावेळी माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी केले. माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी उपस्थित केलेल्या या निवेदनाची दखल घेत विधानसभा अध्यक्ष श्री. राहुल नार्वेकर यांनी, या विषयावर शासनाने तातडीने नोंद घ्यावी आणि योग्य ती कार्यवाही करावी, अशा सूचना संबंधित विभागाला दिल्या आहेत.

**प्रो. जडे यांचे रबरी शिक्के**
**कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले**
**टिकाऊ रबरी शिक्के**
**तयार करून मिळतील.**




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव!



**लातूर/प्रतिनिधी :** साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हा जीवनविचार स्वतः जगणारे आणि शैक्षणिक गुणवत्तेबद्दल प्रचंड तळमळ बाळगणारे दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य तथा आदर्श प्रशासक डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त आज लातूरसह संपूर्ण मराठवाड्याच्या शैक्षणिक, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रांतून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी आपल्या कुशल, शिस्तप्रिय आणि दूरदर्शी मार्गदर्शनाखाली असंख्य युवक-युवतींसमोर एक आदर्श निर्माण केला असून, दयानंद महाविद्यालयाने शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय व राज्य पातळीवर उल्लेखनीय प्रगती केली आहे. सरांच्या सक्षम प्रशासनाचेच हे फलित आहे की, दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालयाला उत्कृष्ट कामगिरीबद्दल SQAAF 'A+' ग्रेड, तर कला महाविद्यालयाला 'नॅक' (NAAC) कडून 'A' मानांकन पटकावता आले आहे. यासोबतच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड द्वारे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ या वर्षाकरिता घेण्यात आलेल्या पारंपरिक अभ्यासक्रमांच्या 'ट्रिपल ए' (AAA) म्हणजेच ऑनलाईन अकॅडमीक अंकेक्षण तपासणी अंतर्गत कला महाविद्यालयाने 'AAA' मानांकनामध्ये 'O' ग्रेड मिळवण्याचा सर्वोच्च बहुमान प्राप्त केला आहे. सरांच्या याच प्रभावी मार्गदर्शनामुळे यंदाच्या अकरावी व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विभागातील प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत कला महाविद्यालयामध्ये 'ऑनलाइन' व ऑफलाइन पद्धतीने सर्वात जास्त प्रवेश नोंदवले जाण्याचा ऐतिहासिक विक्रम दयानंद कला महाविद्यालयाने केला असून, हा पालकांचा आणि विद्यार्थ्यांचा महाविद्यालयावरील अढळ विश्वास दर्शवतो.

केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांचे मुख्य ध्येय असून, त्यांच्या विद्यार्थीकेंद्रित कार्यपद्धतीमुळे त्यांनी अनेक पिढ्यांना योग्य दिशा देण्याचे काम केले आहे. विद्यार्थ्यांच्या बुध्दीत ज्ञानाचे आणि हृदयात संस्काराचे बीज पेरणारे ते एक हक्काचे मार्गदर्शक ठरले आहेत. त्यांच्या या दूरदृष्टीमुळेच आज महाविद्यालयाने क्रीडा, सांस्कृतिक आणि शैक्षणिक गुणवत्ता या सर्वच क्षेत्रांत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात अव्वल स्थान पटकावले आहे. विशेष म्हणजे, सरांच्या यशस्वी नेतृत्वाखाली महाविद्यालयाने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ युवक महोत्सवामध्ये सलग तीन वेळा जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी मिळवण्याची अभूतपूर्व 'हॅट्रिक' साधली आहे. तसेच दयानंद कला महाविद्यालयाने आपल्या कॅम्पसमध्ये 'न भूतो न भविष्यती' असा दैदीप्यमान आणि ऐतिहासिक युवक महोत्सव घडवून आणत संपूर्ण विद्यापीठ क्षेत्रात आपल्या व्यवस्थापनाचा आणि भव्यतेचा एक नवा ठसा उमटवला आहे. त्यांच्या प्रत्येक निर्णयामागे संस्थेच्या प्रगतीची आंतरिक ओढ आणि अहोरात्र कष्ट स्पष्टपणे दिसून येतात.

महाविद्यालयीन सहकाऱ्यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या कोणत्याही अडीअडचणीला तत्परतेने धावून जाणारे आणि समाजसेवेच्या कार्यातून माणुसकीची जपणूक करणारे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी सर्वांच्याच मनात आदराचे अढळ स्थान निर्माण केले आहे. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांना दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष श्री. ललितभाई शाह, उपाध्यक्ष श्री. रमेशकुमार राठी, सचिव श्री. रमेश बियाणी, संयुक्तसचिव श्री. विशाल लाहोटी, सहायक सचिव ड. श्रीकांत उटगे, सहायक सचिव श्री. अजिंक्य सोनवणे आणि कोषाध्यक्ष श्री. संजय बोरा या सर्व सन्माननीय पदाधिकारी व संचालक मंडळाचे मोलाचे मार्गदर्शन, शुभ आशीर्वाद आणि पाठबळ लाभले आहे. वाढदिवसाचे औचित्य साधून संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांसह अनेक महाविद्यालयाचे प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सरांना प्रत्यक्ष भेटून आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून भावी आयुष्यासाठी व निरोगी आरोग्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# 'राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक-कलाकार सन्मान योजना'

## ज्येष्ठ कलावंतांना सन्मानाने जगण्याचा आधार

➤ सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत १ ते ३१ जुलैदरम्यान ऑनलाइन अर्ज प्रक्रिया;

➤ पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना दरमहा ५ हजार रुपये मानधन

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक-कलाकार सन्मान योजना' अंतर्गत कला व साहित्य क्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय योगदान देणाऱ्या १०० ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना दरमहा ५,००० रुपये मानधन प्रदान करण्यात येणार आहे. या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांनी दि. १ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सामाजिक न्याय, समता आणि सर्वसमावेशक विकासाची दिलेली प्रेरणा जपत, आयुष्यभर कला आणि साहित्य क्षेत्रासाठी योगदान देणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना आर्थिक आधार व सन्मान मिळावा, या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांच्या योगदानाचा गौरव करून त्यांना सन्मानपूर्वक जीवन जगण्यास सहाय्य करणे, हा या योजनेमागील प्रमुख हेतू आहे.

या योजनेसाठी अर्जदाराचे वय ५० वर्षांपेक्षा अधिक असणे आवश्यक असून दिव्यांग कलाकारांसाठी वयोमर्यादेत १० वर्षांची शिथिलता देण्यात आली आहे. त्यामुळे दिव्यांग अर्जदारांसाठी किमान वय ४० वर्षे निश्चित करण्यात आले आहे. अर्जदाराचे कला अथवा साहित्य क्षेत्रातील किमान १५ वर्षांचे योगदान आवश्यक असून वयाने ज्येष्ठ असलेले विधवा, परित्यक्ता आणि दिव्यांग कलाकारांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा अधिक नसावे. तसेच ज्यांची उपजीविका प्रामुख्याने कलेवर अवलंबून असून अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही, अशाच पात्र कलाकारांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. केंद्र किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही नियमित मासिक पेन्शन अथवा महामंडळाच्या निवृत्तीवेतनाचा लाभ घेणारे अर्जदार या योजनेसाठी अपात्र राहतील. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक आहे.

ऑनलाइन अर्ज भरताना वयाचा दाखला, आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, प्रतिज्ञापत्र, पती-पत्नीचे संयुक्त छायाचित्र (लागू असल्यास), बँक पासबुक, अपंगत्व प्रमाणपत्र (लागू असल्यास), राज्य अथवा केंद्र शासनाचे संबंधित प्रमाणपत्र (लागू असल्यास), नामांकित संस्था किंवा व्यक्तींचे शिफारसपत्र (लागू असल्यास) तसेच आवश्यक इतर कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

सदर योजना मा. ड. आशिष शेलार, मंत्री (सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास), महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून तसेच मा. डॉ. किरण कुलकर्णी, सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. राज्यातील ज्येष्ठ साहित्यिक आणि कलाकारांच्या कलासाधनेचा सन्मान करून त्यांना सामाजिक व आर्थिक बळ देण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग सातत्याने विविध कल्याणकारी उपक्रम राबवत आहे.

पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांनी अर्जाची अंतिम मुदत लक्षात घेऊन दि. ३१ जुलै २०२६ पूर्वी 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाइन अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम पांडे, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी केले आहे.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात प्रथमच स्टँडर्ड कवच प्रणाली कार्यान्वित;

# सोलापूर-वाडी मार्गावर रेल्वे सुरक्षा आधुनिकीकरणातील महत्त्वाचा टप्पा

**सोलापूर/प्रतिनिधी:**मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने सोलापूर-वाडी मार्गावर (एकूण लांबी १४९.४७६ किमी) 'स्टँडर्ड कवच' प्रणाली यशस्वीपणे कार्यान्वित केली आहे. सोलापूर विभागात 'स्टँडर्ड कवच' प्रणाली कार्यान्वित होण्याची ही पहिलीच वेळ असून, यामुळे रेल्वे सुरक्षा आणि कार्यक्षमतेमध्ये मोठी भर पडली आहे.

'कवच' ही भारत सरकारच्या 'आत्मनिर्भर भारत' उपक्रमांतर्गत स्वदेशी बनावटीची 'ऑटोमॅटिक ट्रेन प्रोटेक्शन' (ATP) प्रणाली आहे. रेल्वे नेटवर्कवरील सुरक्षा लक्षणीयरीत्या वाढवण्यासाठी तयार करण्यात आलेली ही प्रणाली समोरासमोर होणाऱ्या धडकांपासून (head-on collisions) आणि मागून होणाऱ्या धडकांपासून (rear-end collisions) भक्कम संरक्षण देते. तसेच, 'ब्लॉक सेक्शन'मध्ये गाडी अनपेक्षितपणे थांबल्यास लोकोमोटिव्हमधून आपोआप 'SOS' अलर्ट पाठवणे आणि गरज पडल्यास लोको पायलटद्वारे 'मॅन्युअल SOS' सुविधा वापरणे, हे देखील या प्रणालीद्वारे शक्य होते.

'स्टँडर्ड कवच' ही प्रणाली सिग्नलिंगवर आधारित नसलेली (non-signalling based) प्रणाली आहे. ही प्रणाली 'कवच' यंत्रणा बसवलेले लोकोमोटिव्ह आणि रेल्वे पायाभूत सुविधा यांच्यातील अखंड संवादाद्वारे कार्य करते. यात प्रगत ठऋखऊ (रेडिओ-फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन) आधारित ट्रॅक ओळख तंत्रज्ञानाचा वापर केला जातो, ज्यामुळे गाडीचे अचूक स्थान समजते आणि सुरक्षितता वाढते. या प्रकल्पाचा एक भाग म्हणून, सोलापूर-वाडी ब्लॉक सेक्शनमध्ये मंजूर आराखड्यानुसार एकूण १,२३४ RFID टॅग्ज अत्यंत काळजीपूर्वक बसवण्यात आले आणि प्रोग्राम करण्यात आले.

RDSO (रिसर्च डिझाइन्स अँड स्टँडर्ड्स ऑर्गनायझेशन) च्या मानकांनुसार सर्वसमावेशक पडताळणी आणि प्रत्यक्ष चाचण्या (field trials) घेण्यात आल्या. यामध्ये विविध परिचालन परिस्थितींमध्ये समोरासमोर होणाऱ्या धडका रोखणे, मागून होणाऱ्या धडका रोखणे आणि SOS संदेश निर्माण करणे या क्षमतांची कठोर चाचणी करण्यात आली. या कडक चाचण्यांच्या यशस्वी पूर्ततेमुळे प्रणालीची विश्वासार्हता आणि प्रत्यक्ष वापरासाठीची सज्जता सिद्ध झाली आहे.

या अत्याधुनिक सुरक्षा प्रणालीचे कार्यान्वित करण्याचे काम सोलापूर विभागाच्या सिग्नल आणि दूरसंचार विभाग (Signal Telecommunication Department) व प्रकल्प युनिटद्वारे यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले. सोलापूर-वाडी मार्गावर 'स्टँडर्ड कवच' प्रणाली कार्यान्वित होणे, हा रेल्वेच्या सुरक्षा पायाभूत सुविधा बळकट करण्याच्या निरंतर प्रयत्नांमधील आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. प्रगत स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून, ही प्रणाली परिचालन विश्वासार्हता वाढवेल, रेल्वे सुरक्षा सुधारेल आणि प्रवासी व मालवाहतुकीसाठी अधिक कार्यक्षम व भरवशाच्या रेल्वे सेवा प्रदान करण्यास हातभार लावेल.

ही कामगिरी मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाची आधुनिकीकरण आणि तांत्रिक नवोपक्रमांप्रती असलेली दृढ कटिबद्धता, तसेच 'आत्मनिर्भर भारत' उपक्रमांतर्गत अधिक सुरक्षित, स्मार्ट आणि आत्मनिर्भर रेल्वे जाळे उभारण्याच्या भारत सरकारच्या संकल्पनेप्रती असलेली निष्ठा अधोरेखित करते.




## खेळी..

राजपुत्रा जिंकू आणू
वरिष्ठांची नवी खेळी
ताटकळले रांगे मध्ये
निष्ठवंतांचे जाई बळी
दूर सारावे प्रतिस्पर्धी
धमकी वेळी अवेळी
मान्य करुनि घ्यायचे
रोखून बंदुकीचीनळी
आयुष्य होई वाळवंट
उठत राहते वावटळी
परिसरात काहीहोवो
मुलेआपले कवटाळी
सगे सोयरे साथ करे
सहन करत अनर्गळी
प्रवक्ते चालवे टकळी
बडबड व्यर्थ चावळी
परिवारात सत्ता फिरे
फुलत राही वंशावळी
नेतापुत्राच्या सोहळ्या
घाली मी जेवणावळी
नवस बोले जयासाठी
गर्दी भक्ताची राऊळी
उपवास करे कार्यकर्ते
चर्च मशिदी न् देवळी
सत्ता स्नुषा यावी घरां
नेतापुत्र बांधे मुंडावळी
विजयोत्सव करायला
जनता भोळी उतावळी

**हेमंत मुसरीफ पुणे**
९७३०३०६९९६

# मराठवाड्यातील पडीक जमिनींवर वृक्ष लागवडीतून वनीकरण वाढवा:आ.अमित देशमुख यांची मागणी

**लातूर/प्रतिनिधी:** पर्यावरणाचा समतोल राखायचा असेल तर एकूण भूभागाच्या तुलनेत किमान ३३ टक्के वनक्षेत्र असणेआवश्यक आहे. मराठवाड्यात मात्र ३ टक्क्यांपेक्षा कमी वनक्षेत्र आहे. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती आणि कमी पर्जन्यमान पाहता या भागात वनीकरणाची नितांत गरज आहे. पडीक जमिनींचा वापर करून वनीकरण वाढवण्यासाठी शासन प्रयत्न करणार का आणि त्यासाठी टास्क फोर्स स्थापन करणार का, असा प्रश्न राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज विधानसभेत उपस्थित केला.




माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांचे प्रश्न विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनातील प्रश्नोत्तराच्या तासात महाराष्ट्र विधानसभा सभागृहात ९ जूलै रोजी बोलताना माजी मंत्री, आमदार देशमुख म्हणाले की, मराठवाड्यातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी पडीक आहेत, तसेच वन विभागाच्याही अनेक जमिनी ओसाड पडून आहेत. या जमिनी भाडेतत्त्वावर घेऊन किंवा इतर पर्यायांचा विचार करून त्याठिकाणी वनीकरण वाढवण्यासाठी वन विभाग प्रयत्न करणार आहे का? तसेच, या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सरकार एखादा टास्क फोर्स तयार करणार आहे का?

**वनमंत्र्यांकडून टास्क फोर्सची घोषणा**

यावर उत्तर देताना वनमंत्री श्री. गणेश नाईक यांनी सांगितले की, मराठवाड्यासहराज्यातील शासकीय पडीक जमिनींचा उपयोग करून घेण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

मराठवाड्यात वनीकरण वाढवण्यासाठी आणि वृक्षलागवडीची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी निश्चितपणे "टास्क फोर्स" तयार केला जाईल. यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींचाही सदस्य म्हणून समावेश केला जाईल. वनमंत्र्यांनी यावेळी महत्त्वपूर्ण उपाययोजना स्पष्ट केली. बांबू लागवडीवर भर दिला जाणार असून बांबूपासून इथेनॉल निर्मिती करता येते, त्यामुळे मराठवाडा, विदर्भ आणि कोकण यांसारख्या भागांतील पडीक जमिनींवर बांबूची लागवड करून वनीकरण वाढवले जाईल असे सांगीतले.

वनमंत्री म्हणाले की, या योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्याततील पडीक वनजमिनी निवडल्या जातील. या जमिनींना संरक्षक भिंत (कंपाऊंड) उभारून तेथे वृक्ष लागवड केली जाईल, या उपक्रमामुळे पशू-पक्ष्यांचा अधिवास वाढण्याच्या दृष्टीने व्यापक प्रयत्न केले जातील. तसेच तेथे नंतर बांबू लागवड केली जाईल. यामुळे पूरक उत्पन्न मिळेल, पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होईल. वन विभाग आणि सरकार या दिशेने तातडीने कार्यवाही करेल असे सांगीतले. माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नामुळे मराठवाड्यातील ओसाड जमिनींना नवी दिशा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी सुरु; ३१ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये इयत्ता पाचवीमध्ये शिकत असलेल्या आणि ज्यांचा जन्म १ मे २०१५ ते ३१ जुलै २०१७ या दरम्यान झाला आहे, अशा पात्र विद्यार्थ्यांसाठी जवाहर नवोदय विद्यालय इयत्ता सहावी प्रवेश परीक्षेची नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. ही परीक्षा २८ नोव्हेंबर २०२६ रोजी घेतली जाणार आहे.

या परीक्षेसाठी ऑनलाईन पद्धतीने फॉर्म भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ असून इच्छुक व पात्र उमेदवारांनी http://navodaya.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपले अर्ज मुदतीत सादर करावेत, असे आवाहन लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्राचार्यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.


## टी .सी.व मार्क मेमा हरवली आहे

ज्योती कोंडीबा सदानं या नावाचे बारावी पासची टी सी व मार्क मेमो श्री रघुवीर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,चांबरगाव तालुका शिरूर अनंतपाळ, जिल्हा लातूर या विद्यालयाचे खाजगी वाहनाने प्रवास करीत असताना टीसी हरवली आहे. सापडल्यास तात्काळ संपर्क साधावा
संपर्क : ९५४५३९८२९४

## टी .सी. मूळ कागदपत्र हरवली आहे

माया अमोल वैरागी या नावाची बारावी पासची टीसी व मूळ कागदपत्रे. रामराव पाटील उच्च माध्यमिक विद्यालय, केज या विद्यालयाची टी सी. केज ते लातूर प्रवासादरम्यान हरवली आहे. कोणास सापडल्यास संपर्क करावा योग्य बक्षीस दिले जाईल.
संपर्क : अमोल वैरागे, केज तालुका. केज जिल्हा. बीड
मो. ८९८३६८८६८४

## जाहीर प्रगटन

प्रसिद्धीस देण्यात येते की, नवनित शिक्षण प्रसारक मंडळद्वारा संचलित डॉक्टर माणिकराव पाटील प्रायमरी इंग्लिश स्कूल नळेगाव, चाकूर, जिल्हा लातूर ही शासनमान्य शाळा काही वैयक्तिक अडचणीमुळे सदरील शासनमान्य स्वयं अर्थसहाय्य, स्वयं अर्थसंचलित शाळा श्री स्वामी समर्थ बहुउद्देशीय सेवा भावी संस्था या संस्थेत हस्तांतरित करण्याचा निर्णय संस्थेचा, ठराव क्र.४. दि.११/०५/२०१४ अन्वये एकमताने मान्य केलेला असून, त्यात आमची काहीही हरकत राहणार नाही.

तसेच याबाबत कोणास काही हरकत घ्यावयाची असल्यास जाहीर प्रगटन प्रसिद्धीच्या तारखेपासून सहा दिवसांच्या आत आक्षेप संस्थेच्या कार्यालयात सादर करावेत. करिता सदरचे जाहीर प्रगटन प्रसिद्धीस देण्यात येत आहे.

प्रगटन देणार
स्वाक्षरीत
अध्यक्ष
नवनीत शिक्षण प्रसारक मंडळ
नळेगाव

प्रगटन देणार
स्वाक्षरीत
अध्यक्ष
श्री स्वामी समर्थ बहुउद्देशीय
सेवाभावी संस्था शंभू उमरगा
ता.उदगीर जि.लातूर


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६